रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १८ • अंक ३८
www.ramprahar.com

रविवार, २४ ऑगस्ट २०२५ • पाने ८ • किंमत ₹ २



मुंबई : नवभारत आणि नवराष्ट्र वृत्तपत्र समूहांनी शनिवारी महाराष्ट्र फर्स्ट कॉन्क्लेव्ह २०२५चे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते नवभारत समूहाने प्रकाशित केलेल्या विविध कॉफी टेबल बुक्सच्या कव्हरचे अनावरण करण्यात आले. यात पनवेल विकास भरारी या पुस्तकाचाही समावेश होता.

# एक कोटी बहिणींना लखपती दिदी करणार

## ■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा निर्धार; राखी प्रदान सोहळा उत्साहात

**मुंबई : प्रतिनिधी**

आमच्या लाडक्या बहिणींना केवळ १५०० रुपये देऊन शांत बसायचे नाही, तर आम्हाला त्यांना लखपती दिदी बनवायचे आहे, त्यांच्यापर्यंत सक्षमीकरण पोहचवायचे आहे. त्या दृष्टीने सगळे प्रयत्न सुरू आहेत. राज्यात २५ लाख बहिणी लखपती दिदी झाल्या असून एक कोटी बहिणींना लखपती दिदी केल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार देवाभाऊ अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. २३) व्यक्त केला.

नुकत्याच पार पडलेल्या राखी पौर्णिमेच्या अनुषंगाने महाराष्ट्र भाजप महिला मोर्चाच्या वतीने दादरच्या योगी सभागृहात राखी प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता. राज्यातील महिलांनी पाठवलेल्या हजारो राख्या या सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांना प्रदान करण्यात आल्या. त्या वेळी ते बोलत होते.

या सोहळ्याला भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ, मंत्री अॅड. आशिष शेलार, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार विद्या ठाकूर व इतर नेते उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातून आतापर्यंत ३६ लाख ७८ हजार बहिणींच्या राख्या माझ्यापर्यंत पोहचल्या आहेत. राख्या पोहचल्या आहेत आणि काहींनी पत्राद्वारे त्यांच्या भावना पोहचवल्या आहेत. त्या तमाम बहिणींची राखी आणि प्रेम मी स्वीकारतो. जन्मभर मला या प्रेमातच राहायचे आहे. या प्रेमाचे उतराई कधीच व्हायचे नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाच्या विकासाचे स्वप्न बघितले. त्यात त्यांनी सांगितले की, हे विकासाचे स्वप्न पूर्ण करायचे असेल, तर लोकसंख्येचा ५० टक्के हिस्सा जोपर्यंत या स्वप्नाचा भाग होत नाही तोपर्यंत हे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे महिला लक्षित योजनांच्या माध्यमातून पंतप्रधानांनी विकास सुरू केला. बेटी बचाव, बेटी पढावपासून हा प्रवास सुरू झाला. तो प्रवास आता लखपती दिदीपर्यंत येऊन पोहचला आहे. मी लाडक्या बहिणींमुळे मुख्यमंत्री झालो. नव्या भारतात बहिणी समान भागीदार असतील, असे मुख्यमंत्री फडणवीस या वेळी म्हणाले.

अनेकजण म्हणायचे की, निवडणुकीपुरता योजना सुरू केल्या आहेत. निवडणूक संपली की योजना बंद होतील. मी तुम्हाला सांगतो, पाच वर्ष मी यातली एकही योजना बंद होऊ देणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### राहुल गांधींवर निशाणा

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या मतचोरीच्या आरोपावर मुख्यमंत्री फडणवीस या वेळी म्हणाले की, यशामुळे तुम्ही आनंदी आहात, पण काही जणांचे अजूनही समाधान झालेले नाही. हे रोज मतचोरी झाल्याचे म्हणतात. मतचोरी नाही, तर यांचेच डोके चोरीला गेले आहे. बहिणींना विनंती आहे की, यांना अक्कल यावी यासाठीही आशीर्वाद मागा. आमच्या लाडक्या बहिणींच्या मतांना जर हे चोरी म्हणत असतील, तर यांच्यापेक्षा मोठे चोर कोण असतील?

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनाचे पान सचोटीने भरलेले -बाळासाहेब पाटील

## रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धेचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्यांच्या दुःखाशी जोडलेले राहणे, समाजकारणात पारदर्शकता ठेवणे आणि कोणत्याही परिस्थितीत सत्य बोलण्याची तयारी ठेवणे हे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य असून त्यांनी स्वकर्तृत्वाने जीवनाचे पान भरून ठेवले आहे, असे गौरवोद्गार कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांनी शनिवारी (दि. २३) येथे काढले.



(अधिक छायाचित्र पान ८ वर..)

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेल मार्केट यार्डमधील मंडळाच्या सभागृहात रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे ज्येष्ठ नेते व पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर व कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्या वेळी ते बोलत होते.

उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, भाजप माजी शहराध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष गणेश कडू, प्रल्हाद केणी, पं. शंकरराव वैरागकर, बंडाराज घाडगे, नंदकुमार पाटील, हभप निवृत्तीबुवा चौधरी, शंकुनाथबुवा पडघेकर, महादेवबुवा शहाबाजकर, 'सारेगम'फेम जितेंद्र तुपे, इंडियन आयडॉल विजेता सागर म्हात्रे, भाजप पनवेल मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, जे.टी. पाटील, संतोषबुवा पाटील, आध्यात्मिक समन्वय आघाडी कोकण संयोजक मोहन म्हात्रे, सुचिता वांजळे, आयोजन समितीचे पं. उमेश चौधरी, वसंतबुवा पाटील, पूनम ठाकूर, अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, नारायणबुवा पाटील, चंद्रकांत मने, जगदिश म्हात्रे, पवन राजे, शैलेश वाजेकर, विनोद तोडेकर, प्रसाद पाटील, सागर राजे यांच्यासह भजनी मंडळी उपस्थित होती. (पान २ वर..)

# जि.प.च्या दोन कर्मचाऱ्यांसह तिघांना लाच घेताना अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

जलजीवन योजनेतील कामाचे उर्वरित बिल काढण्यासाठी ३५ हजारांची लाच घेणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेच्या वित्त विभागातील दोन कर्मचारी आणि एक खासगी व्यक्तीला रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने जेरबंद केले आहे.

दिलीप कावजी आणि आशिष कांबळे हे दोन जिल्हा परिषद कर्मचारी तसेच विलास ढेबे हा खासगी व्यक्ती अशी कारवाई करण्यात आलेल्या व्यक्तींची नावे आहेत. या तिघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जल जीवन मिशन योजनेंतर्गत पेण तालुक्यातील शेणे गावात सन २०२२-२३मध्ये नळ पाणी योजना मंजूर करण्यात आली होती. वडखळ येथील एमएसएस कन्स्ट्रक्शन कंपनीला या कामाचा ठेका देण्यात आला होता, मात्र हे काम करण्यास ठेकेदार कंपनीला वेळ नसल्याने त्यांनी तक्रारदार यांना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून योजनेचे काम पूर्ण करण्याचा अधिकार दिला होता. (पान २ वर..)

# रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलची सेंटर ऑफ एक्सलन्सला भेट

**सातारा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सातारा येथील सेंटर ऑफ एक्सलन्स या आधुनिक केंद्रास संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या मान्यवर सदस्यांनी भेट दिली.



प्रमुख मान्यवर म्हणून संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन अॅड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे सचिव विकास देशमुख, सहसचिव प्रा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे (उच्च शिक्षण), बंडू पवार (माध्यमिक विभाग), डॉ. राजेंद्र मोरे (ऑडिट), प्राचार्य डॉ.ए.सी. अत्तार, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर तसेच सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, २२ सप्टेंबर २०२४ रोजी संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार यांनी संस्थेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) अभ्यासक्रम केजी ते पीजीपर्यंत सुरू करण्याच्या महत्त्वाच्या सूचना दिल्या होत्या. त्या सूचनेनुसार आज प्राथमिक शाळा ते पदव्युत्तर शिक्षणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता अभ्यासक्रम यशस्वीपणे सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमासाठी सर्व शैक्षणिक गटांसाठी एआयविषयक पुस्तके तयार करून त्याचे पेटंटदेखील मिळविण्यात आले आहे व व्यवस्थितरीत्या सर्व शाळा आणि महाविद्यालयांत एआय कोर्सेस चालू करण्यात आले आहेत, ज्याचा फायदा विद्यार्थ्यांना भविष्यासाठी होणार असल्याचे सांगत याचा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. (पान २ वर..)

# व्हेल माशाच्या उलटी विक्रीचा डाव फसला; तिघे अटकेत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील भांबुर्डा वनपरिक्षेत्रालगत वाहन झडतीमध्ये कोट्यवधी रुपये किमतीची व्हेल माशाची उलटी हस्तगत करण्यात आली. या वेळी चार तरुणांपैकी मास्टरमाईंड पळून गेला असून महाड तालुक्यातील अन्य दोन व पोलादपूर शहरातील एक अशा तिघांची वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी धरपकड केली आहे.

आरोपींनी पुणे परिसरात व्हेल माशाच्या उलटीची विक्री करण्यासाठी एक इनोव्हा कार घेऊन प्लॅन आखला होता. याबाबत वनविभागाला गुप्त सूत्रांमार्फत माहिती मिळाल्यावर भांबुर्डा वनपरिक्षेत्रालगत गुरुवारी रात्री आरोपींचे वाहन आढळून आले. या वेळी रोहित शंकर पवार (रा.धामणी, ता.महाड) हा तरुण पळून गेला, तर शुक्रवारी सकाळी जय धारिया (रा.सुंदरवाडी, महाड), स्वप्नील बबन मोरे (रा.पोलादपूर, मूळ गाव वडाचा कोंड, पोलादपूर) आणि आणखी एक महाडमधील आरोपी अशा तिघांना ताब्यात घेऊन पुणे येथील न्यायालयात शनिवारी हजर करण्यासाठी नेण्यात आले.

# वीजवाहक तार पडून लहान मुलाचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायती मधील सालवड गावात नऊ वर्षांच्या चिमुरड्याचा अंगावर वीजवाहक तार पडून मृत्यू झाला. शिव रूपेश भोसले असे या मयत मुलाचे नाव असून ही दुर्दैवी घटना शनिवारी (दि. २३) दुपारी अडीचच्या सुमारास घडली.

शिव भोसले हा घरातून बाहेर आला असता वीजवाहक तार खांबावरून तुटून त्याच्या अंगावर पडली. त्यामुळे विजेचा जोरदार धक्का शिवला बसला. त्याला तातडीने कर्जत उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले, मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले. या घटनेमुळे ग्रामस्थांनी महावितरणच्या कारभाराविरोधात संताप व्यक्त केला आहे.






# कोकणवासीयांसाठी भाजपतर्फे ३५० एसटी बस आणि ट्रेनची मोफत सुविधा

## मंत्री शेलारांनी दाखवला झेंडा



**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांना मुंबई भाजप तर्फे ३५० एसटी बस आणि ट्रेनची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून मुंबई भाजप अध्यक्ष तथा राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी एसटीला भगवा झेंडा दाखवून या सेवेचा शुभारंभ केला.

कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांना मुंबई भाजप तर्फे दरवर्षी एसटी बसची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते यावर्षी साडेतीनशेहून अधिक गाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आजपासून मुंबईच्या विविध भागातून या गाड्या कोकणाकडे रवाना होणार आहेत. बीकेसी मध्ये या गाड्यांचा नियंत्रण कक्ष उभारण्यात आला असून आज याच ठिकाणी नारळ वाढवून या सेवेचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी आमदार संजय उपाध्याय, सुहास आडिवरेकर, कमलाकर दळवी, जितेंद्र राऊत आणि पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

याबाबत बोलताना आशिष शेलार म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने कोकणवासीयांना आणि गणेशभक्तांना संपूर्णतः आपल्या बाजूने सेवक राहणं आणि मदत करणं ही भूमिका सतत्याने घेतली आहे. म्हणून गणेशोत्सवात कोकणवासीयांसाठी एक विशेष ट्रेन सुरु केली. केंद्रीय रेल्वे मंत्र्यांशी बोलून कोकणात अधिकच्या रेल्वे जाण्यासाठी योजना केली.

आमचे खासदार, आमदार, माजी नगरसेवक आपल्या विभागातून कोकणवासीयांना त्यांच्या गावी सुखरूप जाण्यासाठी वाहन व्यवस्था कार्यक्रम करत आहेत. मुंबई भाजप म्हणून ३५० बसेस आम्ही सोडत आहोत. तर २५ तारखेला एक स्वतंत्र ट्रेन कोकणात रवाना होणार आहे.

# माथेरान घाटात तीन वाहनांचा विचित्र अपघात

**नेरळ : प्रतिनिधी**



माथेरान घाटातील जुमापट्टी येथे आज सकाळी झालेल्या विचित्र अपघाताने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणाचा पुन्हा एकदा पर्दाफाश केला आहे. एस–टन या अवघड वळणावर एकाच वेळी तीन वाहने एकमेकांवर आदळली असून, अपघातात जीवितहानी टळली असली तरी वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

मान्सून सुरू झाल्यानंतर माथेरान घाटातील गटारे साफ करण्यात आले नाहीत. त्यामुळे गटातील पाणी मोठ्या पदरात रस्त्यावर वाहत असल्याने रस्त्यावरील डांबर निघून जाऊन रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांच्या स्वरूपात सरी पडल्याचे चित्र होते. त्याचबरोबर वाहून गेलेल्या पाण्यामुळे खड्ड्यांतील खडी रस्त्यावर पसरली आणि रस्ता निसरडा झाला. परिणामी, घाट उतरत असलेले वाहन चालक ब्रेक मारताना नियंत्रण गमावून बसत असून आजवर घाटात अनेक वाहनांचे यामुळे अपघात घडले आहेत.

मोटरसायकल चालक तर कित्येक वेळा स्लिप होऊन अपघातग्रस्त झालेले आहेत. त्यातच आज मुंबई ठाणे जिल्ह्यातील आलेले पर्यटक हे सकाळी घाट उतरत असताना खाडीवरील पर्यटकांचे वाहन स्लिप होऊन समोरून चढत असलेल्या इरटीका कारवर धडकले. त्याचवेळी मागोमाग येणारी आणखी एक कारही नियंत्रण सुटल्याने अपघातग्रस्त वाहनावर आदळली. सुदैवाने मोठा अनर्थ टळला.

## आयुष्मान कार्डसाठी ३१ ऑगस्ट अंतिम मुदत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील नागरिकांना 'एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' (एबी–पीएमजेएवाय) 'महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना' (एमजेपीजेएवाय) यांचा लाभमिळावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.

या अंतर्गत ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत नागरिकांना 'आयुष्मान भारत गोल्डन कार्ड' तयार करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना प्रतिवर्ष पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार असून, यामध्ये एक हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया व विशेष उपचारांचा समावेश आहे. तसेच कुटुंबातील ७० वर्षांवरील सदस्यांना 'आयुष्मान भारत वय वंदना कार्ड'च्या माध्यमातून अतिरिक्त पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. आरोग्य योजनांचा लाभ घेण्यासाठी कुटुंबातील प्रत्येक सदस्याकडे आयुष्मान भारत गोल्ड कार्ड असणे बंधनकारक आहे.

याशिवाय आशा स्वयंसेविका, आपले सरकार सेवा केंद्र, तसेच स्वस्त धान्य दुकानदार (रेशन दुकानदार) यांच्या माध्यमातूनही कार्ड तयार करता येईल. 'आयुष्मान भारत गोल्ड कार्ड सरकारी तसेच खासगी रुग्णालयांमध्ये लाभार्थी उपचार घेऊ शकतात. जास्तीत जास्त नागरिकांनी या विशेष मोहिमेत सहभाग नोंदवून स्वतःचे व आपल्या कुटुंबीयांचे कार्ड त्वरित काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

शासनाने हे कार्ड बनविण्याची प्रक्रिया आता सुलभ केली असून, नागरिकांना गुगल प्ले स्टोअरवरील 'आयुष्मान ॲप' डाउनलोड करून किंवा https://beneficiary.nha.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन स्वतःच 'आयुष्मान भारत गोल्ड कार्ड' तयार करता येईल.

## बिबट्याच्या मुक्तसंचाराने नागरिक भयभीत; माणगाव भाजपचे वनखात्याला निवेदन

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव तालुक्यातील कशेणे व इंदापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार होत असल्याने नागरिक व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी आपल्या शेतीकामाला जाण्यास घाबरत असून, लहान मुले व महिला घराबाहेर जाण्यास टाळाटाळ करीत आहेत. या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीने उपाययोजना करावी, अशी ठाम मागणी भाजप माणगाव तालुका माजी अध्यक्ष संजयअप्पा ढवळे यांनी केली आहे.

या संदर्भात ढवळे यांनी माणगाव वनविभागाचे वनपरिक्षेत्रपाल प्रशांत शिंदे यांच्याकडे लेखी निवेदन दिले असून या बिबट्याच्या धुमश्चक्रीला आळा घालण्यासाठी तत्काळ पिंजरा लावून त्या बिबट्याला पकडण्यात यावे व त्याला दूर जंगलात सोडण्यात यावे, अशी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली.

या वेळी भारतीय जनता पार्टी माणगाव तालुका माजी अध्यक्ष संजयअप्पा ढवळे, भाजप नेते चिन्मय मोने, दक्षिण रायगड जिल्हा चिटणीस माणगाव तालुका गोविंद कासार, माजी उपतालुका अध्यक्ष अरुण पेणकर, सुरेंद्र साळी, कुर्ले आण्णा, शर्मिला सत्वे, रितेश निवाने, राजू मुंढे, योगेश पालकर, राहुल धूपकर, आनंन राजबर, अश्विनी कडू, जयेंद्र मुंढे, सदानंद अडीत, सोहम शिर्के, मृदल भोनकर, भारत जैन, गणेश राजपुरकर, दीपक भोसले, तुषार नवगणे, जयदीप करडे, रोहित कदम, विश्वास कदम, विशाल शिगवण, रेवती कोळी, राकेश ढवळे, देवेंद्र ढवळे, फौजी अशोक घाग यांच्यासह अनेक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

माणगाव वन विभागाचे वनपरिक्षेत्रपाल प्रशांत शिंदे हे मीटिंगसाठी बाहेरगावी गेल्यामुळे कार्यालयीन अधीक्षक यांच्याकडे हे निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी संजयअप्पा ढवळे यांनी स्पष्ट शब्दात इशारा देत सांगितले की, जर वनविभागाने या बिबट्यासाठी वेळीच खबरदारी घेतली नाही तर भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना होऊ शकते. अशा दुर्घटनेची संपूर्ण जबाबदारी वनविभागावर राहील. ढवळे यांनी पुढे इशारा दिला की, जर वनविभागाने या विषयाकडे दुर्लक्ष केले तर नजीकच्या काळात भारतीय जनता पार्टी माणगाव तालुक्यात उग्र आंदोलन छेडेल असा इशाराही त्यांनी दिला. स्थानिक ग्रामस्थ व शेतकरी यांचा जीव धोक्यात घालून बिबट्याला मोकळे सोडणे योग्य नाही.

नागरिकांनी घाबरून न जाता, प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. वनविभागाच्या सतर्कतेमुळे व नागरिकांच्या सहकार्यामुळे कोणतीही दुर्घटना टाळता येईल, असा विश्वास अधीक्षकांनी व्यक्त केला.

## निवडक

### बेपत्ता तरुणाचा शोध

**चौक :** माथेरानमधून एक तरुण बेपत्ता झाल्याची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रवीण मनोहर



कांबळे (वय २४, रा. रोहीदास नगर माथेरान ता. कर्जत) असे बेपत्ता तरुणाचे नाव असून रंग सावळा, उंची पाच फुट दोन इंच, अंगाने सडपातळ असून त्याचे वर्णन असे की केस काळे, अंगात गुलाबी शर्ट, खाकी पॅन्ट आहे. सोबत रेडमी कंपनीचा मोबाईल (७२७६८६४५७३) आहे. मानेवर ऑपरेशनचे निशाण आहे. कुणाला आढळल्यास ८८८८८३००८५ या क्रमांकावर अथवा जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कमलेश वैरागी याचे सुयश



**नाशिक** : येथील भोसला मिलिटरी स्कूलमध्ये कमलेश सतीश वैरागी याच्या मिलिटरी ट्रेनिंग कोर्समधील उज्वल यशाबद्दल सन्मान करण्यात आला तसेच दहावी बोर्डात ८४ टक्के मार्क मिळाल्यामुळे त्याचा सत्कार, गुणगौरव गुणवंतामध्ये करण्यात आला होता. या यशाबद्दल कमलेश वैरागी याचे अभिनंदन होत आहे.

## 'जिल्ह्याचा जीडीपी तीन लाख कोटींवर नेण्याचा संकल्प'

**रायगड : रामप्रहर वृत्त**



सध्या जिल्ह्याचा जीडीपी एक लाख पाच हजार कोटी इतका आहे. २०२७–२८ पर्यंत तो १ लाख ८६ हजार कोटी होणार आहे, परंतु लघु उद्योग भारती आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे तो २०२७–२८ पर्यंत ३ लाख कोटींवर नेण्याचा विश्वास जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी व्यक्त केला. 'उद्योग सुसंवाद २०२५' कार्यक्रमाचे आयोजन वासुदेव बळवंत फडके सभागृह, पनवेल येथे करण्यात आले होते या वेळी ते बोलत होते.

या वेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, पनवेल महानगरपालिका उपायुक्त वैभव विधाते, जयेश देढीया, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळया तसेच विविध एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष व लघुउद्योजक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की,उद्योग विभागाशी निगडित अनेक प्रश्न प्रलंबित आहेत त्यावर तोडगा काढण्यासाठी सर्व विभागांना सोबत घेऊन, चर्चा करून प्रशासन मार्ग काढत आहे. जिल्हा प्रशासन 'उद्योग सेतू' या उपक्रमाच्या माध्यमातून उद्योजकांचे अडी अडचणी आणि प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत आहे.


लघु उद्योग भारती हा लघुउद्योजक आणि शासन यामधील दुवा म्हणून काम करत असून ऊर्जेच्या प्रश्नावर त्यांनी यशस्वी मध्यस्थी केली आहे. तसेच इन्कम टॅक्स कलम ४३ एच मध्ये सुधारणा करण्यासाठीही त्यांचा मोलाचा वाटा आहे.

रायगड जिल्ह्यात मरीन क्षेत्राला भरपूर वाव असून कोल्ड स्टोरेज, वेअर हाऊस यांना शासनाकडून मिळणाऱ्या सबसिडीचा उद्योजकांनी लाभ घ्यावा, असेही त्यांनी आवाहन केले. नवी मुंबई विमानतळ, दिघी बंदर, जीएनपीटी बंदर, प्रस्तावित रेवस–रेड्डी महामार्ग यामुळे कोकणात इन्फ्रास्ट्रक्चरचे जाळे निर्माण होणार असून त्याचा फायदा उद्योग क्षेत्राला नक्कीच होणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत 'विकसित भारत' घडवण्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्या दिशेने आपण वाटचाल करत आहोत, असेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी उद्योजकांबरोबर संवाद साधला.

मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पनवेल महानगरपालिका उपायुक्त वैभव विधाते, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळया यांनी मनोगत व्यक्त केले.

## अंबा नदीत एक जण वाहून गेला; शोध सुरू



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे (ता. रोहा) येथील आझाद मोहल्ल्यातील रहिवासी व व्यवसायाने चालक असलेले अन्वर अजीज पिंजारी (वय ५५) ही व्यक्ती शनिवारी (दि. २३) सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास वरवठणे पुलावरून पाय घसरल्याने अंबा नदीत पडल्यामुळे पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली. अन्वर यांस नागोठणे पोलिसांनी वाचाविण्याचा प्रयत्न केला, परंतु वाचविण्यास अपयश आले आहे.

याबाबत मिळालेल्या माहिती नुसार अन्वर पिंजारी (रा. आझाद मोहल्ला, नागोठणे ता. रोहा जि.रायगड) हे वरवठणे बाजुकडून नागोठणे बाजुकडे चालत येत असताना जुना वरवटणे पुलावरून अन्वर हे पाय घासरून पडल्याने ते अंबा नदीत पडले. ही माहिती समजताच नागोठणे पोलीस ठाण्याचे अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस आपल्या टीमसोबत घटनास्थळी गेले.

पोलीस शिपाई प्रकाश हंबीर यांनी नदीच्या प्रवाहात उडी मारून अन्वर यांना वाचविण्याचा प्रयत्न केला, मात्र अन्वर पिंजारी नदीच्या पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले असून सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था (रेस्क्यू) यांच्या टीमच्या मदतीने पिंजारी यांची शोधमोहीम सुरू आहे.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनाचे पान सचोटीने भरलेले –बाळासाहेब पाटील

बाळासाहेब पाटील यांनी आपल्या भाषणात पुढे म्हटले की, अशी काही व्यक्तिमत्व असतात, जी कर्तृत्वाने इतकी मोठी असतात की, त्यांचा वाढदिवस एक–दोन दिवस नाही, वर्षभर नाही, तर पुढचे अख्खे आयुष्य साजरा केला तरी कमी पडेल असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्व आहे. सगळ्यांना बरोबर घेऊन जाणारे ते असून त्यांचे हात गगनाला लागले तरी पाय जमिनीवर आहेत. आज मी कितीही पुढे गेलो असलो तरी आपले जुने दिवस न विसरता सगळ्यांचे दुःख जाणणारे असे ते आहेत. अशी काही व्यक्तिमत्त्व असतात की, त्यांच्या वाढदिवसाला काही लोकांना खेचून आणले जाते तसे प्रेम निर्माण होते, कारण सच्चाई ज्यांच्या मनामनात, नसानसात भरलेली आहे असे ते आहेत. ते भारतीय जनता पक्षाचे आहेत म्हणून मी गुणगान कौतुक करत नाही, तर दुसऱ्या पक्षात असतानाही विरोधक म्हणून त्यांच्यावर बोट ठेवण्याची संधी आम्हाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कधी दिली नाही.

आयुष्यामध्ये राजकारणात किंवा समाजकारणात तीन गोष्टी आपण त्याला 'तीन सी' ज्याला म्हणतो कल्चर, कॅरेक्टर व करप्शन या तीन गोष्टींपासून सांभाळून वाटचाल करावी लागते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कल्चरल म्हणून आपली संस्कृती सांभाळली आणि कॅरेक्टरमध्ये इतक्या वर्षामध्ये चुकीचे काम त्यांनी केले नाही याचा साक्षीदार मी आहे तसेच दूरदूरपर्यंत करप्शनचे कुठेही नाव जोडले जाणार नाही असे लोकनेते रामशेठ ठाकूर आहेत आणि अशा नेत्याचा वाढदिवस खऱ्या अर्थाने साजरा करणे म्हणजे आम्ही सगळे स्वतः भाग्यवान समजतो, असे सांगून बाळासाहेब पाटील म्हणाले की, मला जे थोडेसे जीवन कळले त्यामध्ये असे वाटते की, हे जीवन जे आहे ते फक्त तीन पानाचे पुस्तक आहे. पहिले पान म्हणजे आपला जन्म जो ईश्वराने लिहून आपल्याला दिलेला असतो. तिसरे पान म्हणजे मृत्यू तोसुद्धा ईश्वराने आधीच निश्चित केलेला असतो, पण यामधील एक महत्त्वाचे पान आपल्या हातात असते ते म्हणजे मधले पान आपले आयुष्य कसे घडवायचे, कसे जगायचे आणि काय मागे ठेवायचे हे ठरवणारे पान आहे. हेच मधले पान आपण कशा प्रकारे भरतो यावर आपल्या व्यक्तिमत्त्वाची किंमत ठरते. काही लोक हे पान रिकामे ठेवतात, काही साध्या ओळीत भरतात, तर काही थोर व्यक्ती आपल्या कर्माने, विचाराने आणि कार्याने हे पान सुवर्णाक्षरांनी भरून ठेवतात. अशा व्यक्तिमत्वाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर. त्यांनी आपल्या स्वकर्तृत्वाने, लोकसेवेने, शैक्षणिक आणि सामाजिक कार्याने जीवनाचे मधले पान अतिशय समृद्ध करून ठेवले आहे. त्यामुळे त्यांचे आयुष्य एक शिकवण आहे.

या सोहळ्याचे प्रास्ताविक श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केले. अध्यात्म हे महाराष्ट्राचे भूषण असून आपली संस्कृती संपूर्ण देशात पोहचली आहे. राज्य सरकारने याची दखल घेत भांडवली अनुदान म्हणून १८०० भजनी मंडळांना प्रत्येकी २५ हजार रुपये देण्याची घोषणा केली असून त्याबद्दल परेश ठाकूर यांनी सरकारचे आभार मानत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सातत्याने अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करत असून या पुढेही आयोजन करत राहणार आहे, असे प्रास्ताविकात नमूद केले.

**महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. भजनाची आवड निर्माण करण्याचे काम ज्येष्ठांनी केले. त्यामुळे युवक मोठ्या प्रमाणात भजन क्षेत्रात सहभागी आहेत. निवृत्तीबुवा चौधरी यांनी २५ वर्षांपूर्वी जिल्ह्यात भजनाची चळवळ उभारली आणि त्या चळवळीला चालना देण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.**

**–जे.एम. म्हात्रे, माजी नगराध्यक्ष**

## जि.प.च्या दोन कर्मचाऱ्यांसह तिघांना लाच घेताना अटक

यानुसार तक्रारदार यांनी योजनेचे १५ जुलै २०२५ रोजी काम पूर्ण केले. दरम्यान, योजनेचे काम जसे पूर्ण होईल तसे मंजूर निधी देयक ठेकेदार कंपनीला देण्यात आले होते. उर्वरित ६९ लाख रुपयांचे शेवटचे देयक मंजूर करण्यासाठी तक्रारदार जिल्हा परिषदेकडे वारंवार पाठपुरावा करत होते, मात्र हे देयक वित्त विभागाकडून मंजूर केले जात नव्हते.

या संदर्भात तक्रारदार यांनी पाठपुरावा केला असता २२ ऑगस्ट रोजी लोकसेवक दिलीप कावजी यांनी तक्रारदार यांच्याकडे ३५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. तडजोडीनंतर २५ हजार रुपये स्वीकारण्याचे त्यांनी मान्य केले. याबाबतची तक्रार रायगडच्या लाच लुचपतप्रतिबंधक विभागाकडे दाखल करण्यात आली. पडताळणीदरम्यान लोकसेवक कावजी यांनी लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे सापळा लावला गेला असता कावजी यांनी लाचेची रक्कम स्वीकारून ती वित्त विभागातील कनिष्ठ सहाय्यक लेखा व वित्त विभाग पदावर कार्यरत असलेल्या आशिष कांबळे यांच्याकडे सुपूर्द केली. त्यांनी ती रक्कम विलास ढेबे या खासगी इसमाकडे दिली. लाच स्वीकारल्याप्रकरणी पोलिसांनी या तिघांनाही ताब्यात घेतले आहे. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.


## रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलची सेंटर ऑफ एक्सलन्सला भेट




कृत्रिम बुद्धिमत्ता पुढील वाटचालीसाठी आधुनिक एआय सेंटर ऑफ एक्सलन्स कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सातारा येथे उभारण्यात आले असून या केंद्राचा लाभ केवळ रयत शिक्षण संस्थेतीलच नव्हे; तर इतर संस्थांच्या विद्यार्थ्यांनाही होईल, असा विश्वासही चेअरमन दळवी यांनी व्यक्त केला.

## निवडक

### अभिवादन अन् संकल्प सभा



**रसायनी :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, मोहोपाडा रसायनी शाखा कार्याध्यक्ष रोहिदास कवळे यांच्या निवासस्थानी अभिवादन व संकल्प सभा घेण्यात आली. २० ऑगस्ट २०२५ ला डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येला बारा वर्ष झाले असून या निमित्ताने त्यांना अभिवादन केले व संकल्प सभा घेण्यात आली. सुरुवातीला अभिवादन गीताने सुरुवात झाली, व्हिडिओ दाखवण्यात आले. या सभेला कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून आठवणी जागवल्या, संकल्प केला.



**उरण : शहरातील सेंट मेरिज हायस्कूल येथे चौथी इयत्तेत शिकणारी सिया समीर गायकवाड हिने शाडूच्या मातीपासून गणपती बाप्पाची सुबक मूर्ती बनवली आहे. तिचे कौतुक होत आहे.**

# मोकाट कुत्र्यांचा चिमुरड्यावर हल्ला

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर ३४मधील ट्युलिप सोसायटीमधील १० वर्षीय मुलावर मोकाट कुत्र्याने हल्ला कल्याची घटना घडल्याने पालकवर्गामध्ये भीतीयुक्त वातावरण आहे. दरम्यान, पनवेल महापालिकेने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.

खारघर सेक्टर ३४मधील ट्युलिप सोसायटीमधील १० वर्षीय मुलगा दुपारी शाळेतून घरी येत असताना रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या पाच कुत्र्यांनी त्या मुलाला घेरले. चारही बाजुने कुत्र्यांनी घेरल्यामुळे घाबरलेला सदर मुलगा मदतीसाठी जोराने ओरडत होता, घाबरलेला मुलगा खाली पडला होता. यावेळी शेजारील कृष्णा रेसिडेन्सी मधील रहिवाशाने या मुलाचा आवाज ऐकून बाहेर पहिले असता, त्याला पाच कुत्र्यांनी चारही बाजुने घेरले असल्याचे निदर्शनास येताच त्यांनी धाव घेत त्या बालकाला कुत्र्यांच्या घोळक्यातून सोडविले. खाली पडल्यामुळे बालकांच्या घुडगा आणि पायाला दुखापत झाली आहे. सुदैवाने कुत्र्याने त्याला चावा घेतला नाही. शेजारी मदतीसाठी धावून आला नसता तर त्या कुत्र्यांनी मुलांचे लचके तोडले असते.

ही घटना सोशल मीडियावर पसरल्यामुळे शालेय विद्यार्थी आणि पालकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. याबाबत रहिवाशांकडून मिळालेल्या माहितीनुसार खारघर, सेक्टर-३० ते ३५ या परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. रस्त्यावर घोळका मांडून बसलेले कुत्रे रस्त्यावरुन जाणाऱ्या दुचाकी वाहन चालकांचा पाठलाग करीत असल्यामुळे किरकोळ अपघाताच्या घटनाही घडल्या आहेत.

एकंदरीतच खारघर परिसरात मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे शाळकरी मुले, वृध्द, महिला-पुरुष रस्त्यांवर निर्भयपणे वावरु शकत नाहीत. मोकाट कुत्र्यांचा विषय महापालिकेने गांभीयनि घ्यावा आणि त्यांच्या बंदोबस्तासाठी पावले उचलावीत, अशी मागणी खारघरवासियांकडून केली जात आहे. या संदर्भात महापालिकेच्या श्वान विभागाचे अधिकारी डॉ. बी. एन. गीते यांच्याशी संपर्क केला असता, महापालिकेकडून मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांची नसबंदी आणि लसीकरण केले जात आहे. खारघर, सेक्टर-३४ परिसरातील मोकाट कुत्र्यांची नसबंदी आणि लसीकरण केले जाईल, असे त्यांनी सांगितले.

जानेवारी ते जून या सहा महिन्यात ४२६ जणांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला आहे. खारघरमध्ये दिवसाला २ ते ३ जणांना कुत्र्यांनी चावा घेतल्याचे दिसून येते. जून महिन्यात स्पॅगेटी सोसायटी येथे मोकाट कुत्र्याने सुरक्षा रक्षकावर हल्ला करुन त्याचा जबडा फाडल्याची घटना घडली होती, सेक्टर-१० मध्ये सकाळी मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या सायकलस्वाराचा कुत्र्याने चावा घेतला होता.

## उरण पोलिसांतर्फे रूटमार्च



**उरण : वार्ताहर**

उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांच्या मार्गदर्शनासाठी गणेशौत्सव निमित्ताने शुक्रवारी (दि. २२) उरण पोलीस हद्दीत पोलिसांचा रूटमार्च घेण्यात आला. शहरात शांतता रहावी, कायदा व सुव्यवस्था राहावी या उद्देशाने रूटमार्च काढण्यात आला होता.

या रूट मार्चला सुरुवात उरण पोलीस ठाण्यापासून सुरवात झाली. पुढे बक्षी कॉम्प्लेक्स, राजपाल नाका, महात्मा गांधी पुतळासमोरून स्वामी विवेकानंद चौक, एन आय हायस्कूल, कामठा, पालवी हास्पिटल, बालाजी दर्गा, उरण बाजार पेठ पुढे उरण पोलीस ठाणे येथे सांगता समारोप करण्यात आला.

यारूट मार्च मध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक (गुन्हे ) काटवाणी, दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक, २२ पोलीस अंमलदार आदी सहभागी झाले होते.

## दोन सराईत गुन्हेगारांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

स्कॉर्पिओची चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा कक्ष-१ च्या पथकाने अटक केली आहे. सुरेश कालुराम उदाणी (वय ३०), रिचपाल पप्पुराम बिष्णोई (वय २४) अशी या चोरट्यांची नावे आहे. या आरोपींची कसून चौकशी सुरू आहे.

गत जून अज्ञात चोरट्यांनी महिन्यामध्ये नवीन पनवेल परिसरातून एक स्कॉर्पिओ चोरुन नेली होती. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे शाखा कक्ष-१ च्या पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बनकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विश्वास पवार, पोलीस हवालदार आतिश कदम, पोलीस नाईक अरहर मिर्झा व पोलीस शिपाई सचिन पाटील आदींच्या पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवली असता, दोघेही मूळचे राजस्थान येथील असल्याचे तांत्रिक तपासातून निष्पन्न झाले.

आरोपी वारंवार ठिकाण बदलत असल्याने त्यांना पकडणे कठीण होत होते. दोन्ही आरोपी कल्याण-भिवंडी रोड परिसरातील टेमघर येथे येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने टेमघर, कल्याण-भिवंडी रोड परिसरात सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर चौकशीत त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले.

आरोपी सुरेश उदाणी याच्या विरोधात कल्याण येथील महात्मा फुले चौक पोलीस ठाणे, मध्यप्रदेश येथील वायडी नगर पोलीस ठाणे, पुणे येथील कोथरुड पोलीस ठाणे, तसेच कल्याण तालुका पोलीस ठाण्यात फसवणूक, बाक अमली पदार्थ, वाहन चोरी यासारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी भगत यांनी दिली.

## पनवेलमध्ये रस्ते दुरुस्तीला वेग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या तीन महिन्यांत झालेल्या मुसळधार पावसामुळे पनवेल महापालिका क्षेत्रातील अनेक रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. यामुळे नागरिकांना प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. येऊ घातलेल्या सणांच्या तोंडावर महापालिकेतर्फे आता रस्ते दुरुस्तीच्या कामांना मोठ्या प्रमाणात सुरुवात करण्यात आली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांनी बांधकाम विभागाला वेगाने कामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ऑगस्ट महिन्यात पावसाचा जोर कमी होईल अशी अपेक्षा असतानाही दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्ता दुरुस्तीची कामे काही दिवस थांबली होती, मात्र महापालिका आयुक्तांनी बांधकाम विभागाला तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्यानंतर शहरातील प्रमुख रस्त्यांवर खड्डे बुजविणे व डांबरीकरणास सुरूवात झाली आहे. दरम्यान, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व शहर अभियंता संजय कटेकर यांनी



पालिका क्षेत्रातील रस्त्याची पाहणी केली असून नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी वेगाने कामे करण्याच्या सूचना कनिष्ठ अभियंत्यांना दिल्या आहेत.

रस्ते दुरुस्तीची कामे जलद गतीने करण्याच्यादृष्टीने बांधकाम विभागाच्या वतीने महापालिका क्षेत्रातील प्रभागवार कनिष्ठ अभियंत्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रस्ते दुरुस्तीच्या कामांमुळे वाहतूक कोंडीची शक्यता असून, नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

## एमएनएम विद्यालयात अकरावी प्रवेशोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरु नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या ज्युनियर कॉलेज विभागातर्फे नूतन अकरावी इयत्तेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी कॉलेज तर्फे प्रवेशोत्सव करण्यात आला.

मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. अकरावीच्या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत कॉलेज विभागाच्या, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, दिपाली कोल्हे, शमिका कुलकर्णी, स्वाती देशमुख यांनी केले. मुख्याध्यापिका वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना कॉलेज जीवनामध्ये पदार्पण करणाऱ्या अकरावीच्या विद्यार्थ्यांना,



शिस्त, वक्तशीरपणा, नियमित हजेरी, मन लावून अभ्यास करत कॉलेजचे अभ्यासाची परंपरा कायम राखत यश संपादन करावे असे नमूद केले. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे यांनी विद्यार्थ्यांना कॉलेजमधील अभ्यास व सहशालेय उपक्रमात सहभाग घेत उज्वल यश संपादन करावे, असे सांगितले. इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन आणि संयोजन केले.

अकरावीच्या विद्यार्थी मेघराज पहाडी व विद्यार्थिनी कार्तिकी पाटील यांनी नूतन कॉलेज प्रवेशाबद्दल मनोगते व्यक्त केली. इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी फनी गेम्सदेखील आयोजित करण्यात आले. बारावीची विद्यार्थिनी कुमारी जिया पाटील हिने अकरावीच्या विद्यार्थ्यांना कॉलेज प्रवेशाच्या शुभेच्छा दिल्या तसेच शुभी मिश्रा व सायली पाटील यांनी सूत्रसंचालन केले. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या सर्व शिक्षकांनी केली.



**पनवेल : रायगडभूषण पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांचे वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, महादेवबुवा शहाबाजकर, जे.टी. पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी अभीष्टचिंतन केले.**

## उरणमध्ये पोलिसांची दंगा काबू तालीम

**उरण : प्रतिनिधी**

उरणमध्ये गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले असून या सणांच्या अनुषंगाने उरण,मोरा सागरी आणि न्हावाशेवा या सहाय्यक पोलिस आयुक्त शेवा बंदर नवीमुंबई यांच्या आधिपत्त्याखाली कार्यान्वित असलेल्या तीन पोलीस ठाण्याच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.२३) दंगा काबू तालीम घेण्यात आली.

उरण एसटी बस डेपो, चारफाटा येथे घेण्यात आलेल्या दंगा काबू योजनेच्या रंगीत तालीमेत चार सहाय्यक पोलीस निरीक्षक, दोन पोलीस उपनिरीक्षकांसह पोलीस अधिकारी व ५३ पोलीस अंमलदारांसह द्रोणागिरी सिडको अग्निशमन विभागाकडील एक अधिकारी व पाच कर्मचारी यांच्यासह इंदिरा गांधी ग्रामिण रुग्णालयाच्या दोन रुग्णवाहिके सोबत दोन कर्मचारी उपस्थित होते.

ही दंगा काबू योजनेची तालीम योग्य रितीने व शांततेत पार पाडण्यात आल्याची माहिती उरण पोलीस ठाण्याचे नवनियुक्त प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी यांनी दिली.




आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर दक्षता

## पिल्लई कॉलेजमध्ये ‘आरपार’ चित्रपटाचे धमाकेदार प्रमोशन

**पनवेल : वार्ताहर**

पिल्लई एचओसी कॉलेजमध्ये शुक्रवारी मराठी चित्रपट ‘आरपार’च्या प्रमोशनचा देखणा सोहळा झाला. या कार्यक्रमाला चित्रपटाचे मुख्य कलाकार ललित प्रभाकर आणि हृता दुर्गुळे उपस्थित राहिले. विद्यार्थ्यांनी कलाकारांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

चित्रपटाच्या ट्रेलरला आधीच प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला असून कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर कलाकारांनी आपल्या चित्रपटाविषयी अनुभव मांडले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कलाकारांनी त्यांच्या कॉलेज जीवनातील आठवणी शेअर केल्या आणि प्रेक्षकांना नक्कीच हा चित्रपट आवडेल असा विश्वास व्यक्त केला.कॉलेजच्या प्रेक्षकांनी चित्रपटातील



गाण्यांवर ठेका धरत कलाकारांसोबत खेळकर गप्पा केल्या.

या वेळी प्राचार्य, प्राध्यापकवर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. ‘आरपार’ हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, त्याला भरभरून प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत**

संवेदना संस्थेतर्फे मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी बरेच उपक्रम चालू असतात. त्यातील एक म्हणजेच शालेय मुलांच्या सर्वांगीण विकासाचे काम हे होय.

विद्यार्थ्यांना मदत म्हणून शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी संस्थेच्या मार्फत नेहमीच प्रयत्न केला जातो. अशीच एक पेणजवळील बळवली येथील जिल्हा परिषद शाळा ही होय. साधारण २०२१ सालापासून संस्थेतर्फे या शाळेला गणवेशासाठी कापड, शैक्षणिक साहित्य वाटप तसेच आदिवासी पाड्यातून येणाऱ्या मुलांना सत्तावीस नवीन सायकलीही देण्यात आल्या होत्या.



सध्या या शाळेत पहिली ते नववीचे ११२ विद्यार्थी शिकत आहेत. ऑगस्ट महिना संपत आला तरीही अजून विद्यार्थी शैक्षणिक साहित्यापासून वंचित आहेत. याच साहित्याचे वाटप संस्थेतर्फे करण्यात आले. यासाठी मदतीचा हात म्हणून समाजातील दानशूर व्यक्ती तसेच संवेदना संस्थेतील महिलांनी आर्थिक मदत केल्याने हे साहित्य वाटप करणे शक्य झाले.

## गव्हाण विद्यालयात करिअर क्लब मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण येथील श्री छत्रपती विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी करिअर क्लब मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. व्यावसायिक संधीच्या भविष्यकालीन वाटा कशा निवडाव्यात या अनुषंगाने समुपदेशन करण्यात आले.

शुक्रवारी करिअर मार्गदर्शिका करूणा तांडेल यांनी इयता ८वी च्या विद्यार्थ्यांना तुकडी निहाय मार्गदर्शन करताना विविध क्षेत्रातील करिअर संधींबाबत माहिती दिली. वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी,संरक्षण,कला, क्रीडा, माहिती-तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रांबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. करिअर समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना योग्य वेळी आवश्यक दिशदिग्दर्शन करण्यात विषयी आश्वासीत करण्यात आले.

या करिअर क्लब मार्गदर्शन करण्यासाठी दर्शना माळी, वृषाली म्हात्रे व सुजाता चौधरी यांचे विशेष सहकार्य लाभले.




रामप्रहर

दिवाळी २०२५

मुक्तछंद

मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.

चला तर लागूया कामाला...

ramprahar@gmail.com


## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात इन्क्ड मॅथेमॅटिक्स स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.२३) गणित विभागातर्फे 'इन्क्ड मॅथेमॅटिक्स' या रंगीबेरंगी स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आगळ्या-वेगळ्या पेपर डिश पेंटिंग बनवले होते तसेच या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी गणित आणि रंगांची सांगड घालत सर्जनशीलता साकारली. या स्पर्धेचा उद्देश गणित विषयाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण करणे तसेच त्यांच्या कलात्मक प्रतिभेला वाव देणे हा होता यावेळी विद्यार्थ्यांनी विविध गणितीय संकल्पना, आकृती, सूत्रे, आणि नमुने आकर्षक रंगसंगतीतून पेपर डिशवर साकारले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या स्पर्धेमध्ये परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक केले आणि अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे गणित विषय अधिक सुलभ व रंजक बनतो, असे मत व्यक्त केले. या स्पर्धेचे आयोजन गणित विभागप्रमुख प्रा. प्रतीक्षा पाटील यांनी केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमाच्या आयोजन केल्याबद्दल गणित विभागाचे अभिनंदन केले तसेच शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# नृत्य बिजली म्हणावे असा झपाटा...

साधारण वर्षभरापूर्वीची गोष्ट. एकोणसाठाव्या महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवातील चित्रपती व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार उषा चव्हाण यांना जाहीर झाला आणि उषा चव्हाण यांच्या अतिशय मेहनती, यशस्वी वाटचालीचा हा गौरव आहे असे मला मनोमन वाटले.

सध्या उषा चव्हाण पुणे शहरात राहताहेत आणि त्यांनी चित्रपटसृष्टीपासून दूर राहणे पसंत केले आहे. त्यामुळेच त्या वरळीतील डोम थिएटरमध्ये अतिशय शानदारपणे रंगलेल्या चित्रपट महोत्सवाला हजर राहिल्या नाहीत. त्यांच्या वतीने निर्माता, दिग्दर्शक व वितरक विजय कोंडके यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

उषा चव्हाण यांच्या भेटीचे मला योग आले. एक आठवणीत राहिलेला योग दादा कोंडके अभिनित व दिग्दर्शित पळवा पळवा (१९९०) या चित्रपटाच्या कोल्हापूर येथील जयप्रभा स्टुडिओतील चित्रीकरणाच्या वेळचा. या चित्रपटाच्या शूटिंग रिपोर्टिंगसाठीचा मुंबईतील आम्हा सिनेपत्रकारांचा हा दौरा होता. उषा चव्हाण अगदी रोखठोक बोलणाऱ्या. याच वेळेस त्यांच्याशी विशेष संवाद साधण्याची संधी मिळाली असता त्यांनी सांगितलेली एक विशेष गोष्ट, मुख्य नायिकेच्या अवतीभवतीची छोटीशी भूमिका अथवा नृत्यात सहभाग घेत आपली रूपेरी पडद्यावरील प्रवास सुरू करून मग मुख्य नायिकेची संधी मिळाली असे अनेक अभिनेत्रींबद्दल झालेय/होत असते, पण त्यात एकादी मजेशीर गोष्टही घडते. उषा चव्हाणबद्दल तशीच गोष्ट घडली. त्यांनी अनंत माने दिग्दर्शित 'सवाल माझा ऐका' या चित्रपटात जयश्री गडकर यांच्या बाजूला लावणी नृत्यात सहभाग घेतला, पण त्यांचा तो सहभाग लक्षवेधक होता. त्यावेळी त्यांना दिवसाला पंधरा रुपये मानधन मिळत असे. १९६४ साली ही रक्कम बरीच समाधानकारक होती. त्यानंतर अनंत माने यांनी 'केला इशारा जाता जाता' या चित्रपटाबाबत त्यांच्याशी बोलणे सुरु करताच त्या म्हणाल्या, आता मला दिवसा



वीस रुपये असं मानधन हवे. अनंत माने म्हणाले, यावेळी जास्त मानधन मिळेल, कारण या चित्रपटात तू नायिका आहेस. उषा चव्हाण यांनी ग्रुपमध्ये नृत्यात चमक दाखवली हे एखाद्या दिग्दर्शकाने हेरणे आणि अशी नायिकेची संधी देणे हेच विशेष होय.

अशीच आणखी एक गोष्ट, चित्रपटाच्या जगात यश हेच सर्वात मोठे चलनी नाणे हे सर्वकालीन मोठे सत्य आहे, पण यशाचे सातत्य टिकवून राहणेही आवश्यक आहे. उषा चव्हाण नायिका असलेला 'केला इशारा जाता जाता' हा पहिलाच चित्रपट ज्युबिली हिट ठरल्याने साहजिकच आणखी काही मराठी चित्रपटात भूमिका मिळाल्या. खंडोबाची आण, मुक्काम पोस्ट ढेबेवाडी, मला तुमची म्हणा हे उषा चव्हाण नायिका असलेले चित्रपट अपयशी ठरल्याने पुढची वाटचाल अवघड होती. अशातच दादा कोंडके यांच्या 'सोंगाड्या' या चित्रपटासाठी जयश्री गडकर इत्यादी अभिनेत्रींनी नकार दिला, म्हणून उषा चव्हाणची दादा कोंडके यांनी निवड केली आणि हा चित्रपट असा काही सुपर हिट ठरला की दादा कोंडके आणि उषा चव्हाण ही








मराठी चित्रपटसृष्टीतील एक सुपर हिट जोडी ठरली. सोंगाड्या, एकटा जीव सदाशिव, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, बोट लावीन तिथे गुदगुल्या, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, सासरचं धोतर, वाजवू का या मराठी आणि तेरे मेरे बीच मे, अंधेरी रात मे दिया तेरे हाथ मे' या हिंदी अशा एकूण बारा चित्रपटात ही जोडी एकत्र आल्याचा विक्रम घडला. ही गोष्ट इतक्यावरच थांबत नाही, बोट लावीन तेथे गुदगुल्या या चित्रपटातील लोकप्रिय गाणे ढगाला लागली कळ या नावाचा चित्रपट निर्माण झाला त्यात उषा चव्हाण नायिका होती. यश हे असे असते. ते साथ देते तेव्हा दूरवर देते.

सत्तरच्या दशकात हिंदी चित्रपटसृष्टीत जे स्थान धर्मेंद्र आणि हेमा मालिनी यांच्या जोडीला होते, अगदी तेच स्थान मराठी चित्रपटात दादा कोंडके आणि उषा चव्हाण यांना होते. पडद्यावर उत्तम जमलेल्या या केमिस्ट्रीला त्यांचे चाहते प्रत्यक्षातही एखाद्या सोहळ्यास एकत्र पाहण्यास विशेष उत्सुक असत. दोघांपैकी एक जरी कोणी नसले तरी एखादा चाहता त्याबाबत अगदी बेधडकपणे प्रश्न करी आणि त्याचाच मग होणारा किस्सा बराच काळ चघळला जाई. असं असलं तरीही उषा चव्हाणला स्वतःचं व्यक्तिमत्व, शैली आणि ओळख आहे. त्यांचा जन्म १८ ऑगस्ट १९५० रोजीचा कोल्हापुरातील. म्हणजेच त्यांनी वयाची पंचाहत्तरीत प्रवेश केला आहे.

उषा दत्तात्रय चव्हाण असे त्यांचे पूर्ण नाव. त्यांनी चित्र-नाट्यसृष्टीत प्रवेश केला तो केवळ गरजेपोटी. घरची अत्यंत गरीबी म्हणून त्यांनी शाळा सोडली. त्या फक्त सातवी इयत्ता शिकल्या आहेत. खरंतर शाळेत असताना त्या हुशार आणि कर्तव्यदक्ष होत्या. शाळेतील क्रीडा स्पर्धेत आवर्जून भाग घेत. हुतुतू, खो खो, लंगडी आदी मर्दानी खेळात त्यांनी चांगलेच प्राविण्य मिळवल्याने त्या शाळेच्या संघाच्या आधारस्तंभ ठरल्या. त्याच वयात त्यांना नृत्याची आवड लागली, पण नृत्याचे रितसर प्रशिक्षण घेणे शक्य नसल्याने स्वतःचा सराव, निरीक्षण आणि विलक्षण जिद्द. या जोरावर त्या लोकनृत्यासह शास्त्रीय नृत्यही शिकल्या आणि हाच त्यांचा गुण त्यांना संपूर्ण कारकिर्दीत महत्वाचा ठरला. नृत्यासह त्यांना अभिनयातही गती होती. आपल्या या गोष्टी त्यांनी खूप मेहनतीने विकसित केल्या.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

हळूहळू त्यांनी मेळे, नाटके यातून कामे करायला सुरुवात केली. त्यावेळी त्याना एका वेळी पंधरा, वीस रुपये मिळत, ते पैसे घरासाठी उपयोगी ठरत. त्याच वेळेस त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल टाकले. 'आज दुपारी फोडली सुपारी', 'बेलभंडार', 'लवंगी मिरची कोल्हापूरची' या लोकनाट्यात त्यांनी भूमिका साकारताना ग्रामीण भागात दौरे केले.

असे सुरू असतानाच मराठी चित्रपटात समूह नृत्यात (म्हणजे नायिकेच्या मागे अथवा आजूबाजूला) भाग घेण्यासाठी त्यानी मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला आणि हा चित्रपट होता, अनंत माने दिग्दर्शित 'केला इशारा जाता जाता'. त्या लावणीप्रधान चित्रपटात जयश्री गडकर यांच्या मागे स्टेजवर ग्रुपमध्ये नाचत उषा चव्हाण यांनी मराठी चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले, पण तेच पाऊल मग खूप मेहनतीने त्यांनी योग्य असल्याचे कालांतराने सिद्ध केले. त्याच वेळेस त्यांना 'सवाल माझा ऐका' या चित्रपटातही भूमिका मिळाली. १९६४ सालचा हा चित्रपट आहे.

उषा चव्हाण यांना खणखणीत यश मिळाले ते दादा कोंडके यांच्या 'सोंगाड्या' (१९७१) या चित्रपटापासून! दादा कोंडके युगही याच चित्रपटाने सुरू झाले. या चित्रपटाच्या तडाखेबाज यश उषा चव्हाण यांना मराठी चित्रपटाची नृत्यनिपुण अभिनेत्री अशी ओळख मिळवून देणारे ठरले. या चित्रपटापासून दादा कोंडके आणि उषा चव्हाण ही सुपर हिट जोडी जमली. प्रेक्षकांनी या जोडीला शब्दशः डोक्यावर घेतले. या जोडीचे हे सगळे चित्रपट खणखणीत रौप्यमहोत्सवी यश संपादण्यात यशस्वी ठरले. भालजी पेंढारकर दिग्दर्शित 'गनिमी कावा' या चित्रपटाही ही जोडी होती. दिग्दर्शक मनमोहन देसाईनी या जोडीने आपल्या 'कुली' या चित्रपटात एकत्र नृत्य साकारावे यासाठी बरेच प्रयत्न केल्याची तेव्हा बरीच चर्चा झाली. प्रत्यक्षात मात्र तसे झाले नाही.

आपल्या या यशस्वी कारकिर्दीत उषा चव्हाण यांना काही मानाचे पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. १७व्या महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात १९७८ साली त्यांना 'बोट लावीन तिथं गुदगुल्या' या चित्रपटातील मैना रुकडीकर या भूमिकेसाठी तो मिळाला. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील अभिनयासाठी हा पुरस्कार त्यांना मिळाला हे विशेष उल्लेखनीय आहे. उषा चव्हाण यांच्या काही भूमिकांचा विशेष उल्लेख करायला हवाच. दिनकर द पाटील दिग्दर्शित 'सूनबाई ओटी भरून जा' (१९७९) आणि अरुण कर्नाटकी दिग्दर्शित 'रानपाखरं' (१९८०). यापैकी सूनबाई ओटी



भरुन जा या चित्रपटात त्यांनी स्त्रीची विविध रूपे साकारलीत. ही खूपच आव्हानात्मक व्यक्तिरेखा होती. या व्यक्तीरेखेचे नाव चंपा. खूनाचा आळ पचवून आणि दमेपर्यंत पायात चाळ बांधून ती आपल्या मुलाला बॅरिस्टर करते. तर 'रानपाखरं' याहीपेक्षा वेगळी भूमिका. कुटुंबासाठी तमाशाचा फड चालवणारी लीला कालांतराने वयपरत्वे थकते. ती आतून तुटली आहे. तिला जिद्ददेखील सोडून गेली आहे. डोळे पार खोल गेलेत. धानोरीच्या एस. टी. स्टँडवर पुढ्यात पेटी घेऊन गात आहे आणि दुर्दैवाने गाता गाताच तिथेच तिची प्राणजोत मालवते. शरद पिळगावकर निर्मित आणि मुरलीधर कापडी दिग्दर्शित 'चोरावर मोर' (१९८०) हा तसा रमेश सिप्पी दिग्दर्शित 'सीता और गीता' (१९७२) या चित्रपटाची रिमेक. मूळ चित्रपटात हेमा मालिनीने जबरदस्त दुहेरी भूमिका साकारली. उषा चव्हाण यांनीही भिन्न स्वभावाच्या शांता आणि दुर्गा या जुळ्या बहिणी साकारत धमाल उडवली. कडकलक्ष्मी, नाव मोठे लक्षण खोटे, मंत्र्यांची सून, भामटा, जिद्द, सख्या सजना अशा अनेक मराठी चित्रपटात त्यानी विविध प्रकारच्या साकारल्या. एकीकडे दादा कोंडके यांच्या चित्रपटांची हुकमी नायिका (अधेमधे त्यांचे दादांशी बिनसायचे तेव्हा इतर कोणी अभिनेत्री त्यांच्या चित्रपटात असे) आणि इतर निर्माता आणि दिग्दर्शकांच्या चित्रपटातून मोठ्या प्रमाणात भूमिका असा एक छान समतोल उषा चव्हाण यांनी राखला. ग्रामीण मराठी चित्रपटातही उत्तम कथासूत्र नक्कीच असते हे या चित्रपटांनी सिद्ध केले.

अशा वाटचालीत उषा चव्हाण यांनी आपल्या 'अभिनय चित्र' या चित्रपट निर्मिती संस्थेची स्थापना केली आणि १९८८ साली त्यांनी कथा, पटकथा, संवाद गीते, निर्माती, दिग्दर्शिका आणि मुख्य नायिका अशी जबाबदारी उचलून 'गौराचा नवरा' हा चित्रपट निर्माण केला. त्यात त्यांनी दुहेरी भूमिका साकारली. या चित्रपटात लक्ष्मीकांत बेर्डे, कुलदीप पवार, शरद तळवळकर, वसंत शिंदे इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. त्यानंतर १९९२ साली पुन्हा अशीच अष्टपैलू कामगिरी करत 'धरपकड' हा चित्रपट निर्माण केला. या चित्रपटात अशोक सराफ, निळू फुले, श्रीकांत मोघे, राम नगरकर इत्यादींच्या प्रमुख भूमिका आहेत. याशिवाय 'शिरडी के साईबाबा' या चित्रपटात त्यांनी एक नृत्य साकारले. उषा चव्हाण यांनी पडद्यावर अनेक तरी सुपर हिट गाणी साकारलीत. राया चला घोड्यावरती बसू, मळ्याच्या मळ्यामध्ये कोण गं उभी, काय गं सखू , बिब घ्या बिब शिकेकाई (सोंगाड्या), काल रातीला सपान पडलं (एकटा जीव सदाशिव), सख्या सजना नका तुम्ही जाऊ, मी न्हाई यायची शिणुमाला (सख्या सजना), एक हौस पुरवा महाराज मला आणा कोल्हापूरी साज (सोनारानं टोचलं कान), अंगात डगला कमरेला पट्टा, अहो हवालदार माझ्या कुलुपाची चावी हरवली, बाई ग केळेवाली मी सांगा तुम्हाला शोभलं का? (पांडू हवालदार), बाई माझ्या बकरीचा लागला लळा, गंगू तारुण्य तुझं बेफान जसा इष्काचा ॲटमबॉम्ब (राम राम गंगाराम), काल दुपारी फुटली सुपारी (नवरा माझा ब्रह्मचारी), लपवू नका छपवू नका (बोट लावीन तिथं गुदगुल्या) या गाण्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर लोकप्रियता संपादली. ग्रामीण भागातील टूरिंग टॉकीजमधील त्यांच्या चित्रपटांची लोकप्रियता व लाऊडस्पीकरवरील गाणी ही उल्लेखनीय गोष्ट.

उषा चव्हाण यांच्या आणखीन काही उल्लेखनीय चित्रपटात भैरु पैलवान की जय, नवरा माझा ब्रह्मचारी, चोरीचा मामला, पैज, चांडाळ चौकडी अशा अनेक मराठी चित्रपटात भूमिका साकारली. शिरडी के साईबाबा या चित्रपटातही त्यांनी गाणे सादर केले. सत्तर व ऐंशीच्या दशकात त्यांची उल्लेखनीय वाटचाल होती.

उषा चव्हाण यांना प्रवासाची खूप आवड. आपल्या मराठी चित्रपटांच्या शूटिंगच्या निमित्ताने तर मुंबई, पुणे, कोल्हापूर, सातारा असे फिरणे होईच. त्याशिवाय आपल्या चित्रपटांच्या प्रीमियरसाठी नाशिकपासून इचलकरंजीपर्यंत फिरणे होईच. 'तेरे मेरे बीच मे'च्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यासाठी हैदराबादला जाणे झाले. उषा चव्हाण यांना घरकामाची आणि बागकामाचीही खूप आवड. पुण्यातील आपल्या 'अभिनय' बंगल्यावर त्याचा पूर्वी नेहमीच प्रत्यय येई. देवभूजेला प्राधान्य देणे, उपास तपास करणे गरजेचे मानले. खाण्या-पिण्याची विशेष शौकिन नाही, पण पूर्वी झुणका भाकर आवडीने खात.

उषा चव्हाण यांच्याबाबतीत एक अगदी वेगळी आठवण म्हणजे, एकदा त्या शिवतीर्थावरील शिवसेना मेळाव्यात दादा कोंडके यांच्यासोबत आल्या असताना त्यांनी त्या प्रचंड मेळाव्यात जोरदार भाषण करुन सर्वांनाच आश्चर्यचकित केले. ही वृत्तपत्रातील चौकटीची बातमी झाली.

कालांतराने उषा चव्हाण यांनी चित्रपटसृष्टीपासून दूर जाण्याचा निर्णय घेतला. आता त्या पुणे शहरात आपल्या कुटुंबासह राहतात. उषा चव्हाण या केवळ एक अष्टपैलू अभिनेत्री नसून एक उत्तम नर्तक आणि गायिकादेखील आहेत. 'मुक्काम पोस्ट ढेबेवाडी..' या चित्रपटातील हिरव्या माडीचा जिना अवघडत्यांनी गायलेले गाणे लोकप्रिय झाले होते. उषा चव्हाण यांनी तेलुगू चित्रपटातही भूमिका केल्या आहेत. ज्ञात 'दुर्दबीट्टा' या तेलगू चित्रपटात त्यांनी दक्षिणेकडील लोकप्रिय अभिनेता राजकुमारसोबत काम केले. दादा कोंडके यांनी त्यांच्या खडकवासला येथील स्टुडिओच्या पाच ट्रस्टीपैकी एक म्हणून उषा चव्हाण यांचे नाव मृत्यूपत्रात लिहीले होते. या स्टुडिओच्या भव्य दिमाखदार उदघाटन सोहळ्यास मुंबईतील आम्हा चित्रपट पत्रकारांचा खास दौरा आयोजित केला होता. उषा चव्हाण यांचे लग्न दत्तात्रय कडू देशमुख यांच्याशी झाले होते. ते पुण्यातील जमीनदार होते. हृदयनाथ कडू देशमुख असे या जोडप्यास एक मुलगा आहे. उषा चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा. चित्रपट क्षेत्रातील दीर्घकालीन वाटचालीतील हा एक वेगळा टप्पा.

# लढवय्ये नेते अरुण जेटली

माजी केंद्रीय अर्थमंत्री, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ताठ ठेवण्यासाठी आपले कौशल्य पणाला लावणाऱ्या अरुण जेटली यांचा आज स्मृती दिन आहे. वयाच्या ६६व्या वर्षी दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरच श्वास घेतला.

२८ डिसेंबर १९५२ रोजी अरुण जेटली यांचा जन्म झाला व दिल्लीतच शिक्षण झाले. विद्यार्थीदशेतच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून युवा नेता म्हणून त्यांनी ओळख मिळवली. वडील पेशाने वकील असल्याने त्यांच्यात तो सभाधीटपणा, वाक्‌चातुर्य, लढवय्या स्वभाव, नेतृत्व गुण आपोआप आले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सेंट झेवियर्समध्ये झाले. पुढे श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्समधून वाणिज्य शाखेत पदवी संपादन केली. १९७४मध्ये त्यांनी दिल्ली विद्यापिठातून कायदा शाखेतील पदवी मिळवली. दिल्ली विद्यापीठात अभाविपकडून १९७४मध्ये विद्यार्थी नेता म्हणून निवड करण्यात आली. याच काळात त्यांच्यातील नेतृत्व गुण समोर आले आणि त्यांचा त्यांनी विद्यार्थ्यांच्या उत्कर्षासाठी अत्यंत खुबीने वापर केला.

आणीबाणीच्या काळात अरुण जेटली यांनी १९ महिने तुरुंगवास



भोगला. १९७३मध्ये राज नारायण आणि जेपी नारायण यांनी भ्रष्टाचाराविरोधात उघडलेल्या मोहिमेत जेटली एक प्रमुख युवा नेते होते. आणीबाणीनंतर तुरुंगातून सुटल्यानंतर अरुण जेटलींनी जनसंघात प्रवेश केला.

चार्टर्ड अकाऊंटंट होण्याची इच्छा असलेले जेटली वकील झाले. सुप्रीम कोर्ट आणि देशातील विविध हायकोर्टांमध्ये त्यांनी वकिली केली. १९९०मध्ये त्यांना दिल्ली हायकोर्टाने वरिष्ठ वकील म्हणून मान्यता दिली.

व्ही.पी. सिंह सरकारकडून १९८९मध्ये जेटलींची अतिरिक्त सॉलिसिटर जनरल म्हणून निवड करण्यात आली. बोफोर्स घोटाळ्याच्या चौकशीतही त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात आली. जनता दलचे नेते शरद यादव, काँग्रेसचे दिवंगत नेते माधवराव शिंदे आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्यासाठी जेटलींनी वकिलीही केली.

पेप्सिकोविरुद्ध कोकाकोला हे प्रकरणही जेटलींनी हाताळले. कायदेमंत्री असताना जेटलींनी पेप्सीकोसाठी खटला लढवला आणि हिमालयातील रस्त्यांवर जाहिरात करणाऱ्या आठ कंपन्यांना दंड ठोठावण्यात महत्त्वाची भूमिका निभावली.

जेटलींनी २००९मध्ये वकिली थांबवली. राज्यसभेत विरोधी पक्षनेता म्हणूनही त्यांनी काम पाहिले. अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये विविध मंत्रालयांची जबाबदारी सांभाळली.

भाजपमध्ये अनेक पदांवर जेटलींनी काम केले. २०१४पर्यंत ते जनतेमधून कोणतीही निवडणूक लढले नव्हते, पण २०१४मध्ये त्यांनी अमृतसरमधून निवडणूक लढले आणि काँग्रेसचे तेव्हाचे उमेदवार कॅप्टन अमरिंदर सिंह यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. यानंतर त्यांना राज्यसभेवर खासदार म्हणून निवडण्यात आले.

निष्णात वकील असलेले जेटली सभागृहात विरोधकांना तोंड देण्यासाठी एकटेच पुरेसे ठरत असत. मोदी सरकारच्या काळात त्यांनी अर्थमंत्रीपद सांभाळताना अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. संरक्षण मंत्रालयाचीही जबाबदारी त्यांनी काही वेळा सांभाळली. नोटाबंदी, जीएसटी हे जेटलींच्या काळातील महत्त्वाचे निर्णय ठरले.

एनडीए सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात मंत्रीपद न देण्याबाबत अरुण जेटली यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती केली. प्रकृतीच्या कारणास्तव त्यांनी विश्रांती घेणे पसंत केले. त्यांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांना ९ ऑगस्ट रोजी दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. त्या वेळी तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद, पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्री हर्षवर्धन, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आदींनी 'एम्स'मध्ये जाऊन जेटलींच्या प्रकृतीची विचारपूस केली होती.

अरुण जेटली हे गेले १५ दिवस अक्षरश: मृत्यूशी झुंज देत होते. वैद्यकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार फुप्फुसात संसर्ग झाल्याने त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता. जेटलींना मधुमेह अर्थात डायबिटीजही होता. त्यात त्यांच्यावर किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाली होती. शिवाय त्यांना पेशींचा कर्करोगही झाला होता. त्याआधी त्यांच्यावर लठ्ठपणा कमी करण्यासाठीही शस्त्रक्रिया झाली होती. अखेर २४ ऑगस्ट २०१९ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. (साभार : इंटरनेट)

# श्रेष्ठ कवयित्री बहिणाबाई चौधरी

प्रतिभावान कवयित्री अशी बहिणाबाई चौधरी यांची ओळख राहिली आहे. आज त्यांची जयंती. बहिणाबाईंचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी खानदेशातील असोदे या गावात झाला. हे गाव जळगावपासून पाच-सहा किमी इतक्या अंतरावर आहे. त्यांच्या वडिलांचे नाव उखाजी महाजन आणि आईचे नाव भिमाई होते.



१८८०चा काळ म्हणजेच भारतातील ब्रिटिश राजवटीचा कालखंड होय. या काळात भारतीय सुधारकांची दुहेरी लढाई नुकतीच सुरू झालेली. एकीकडे सामाजिक सुधारणेसाठी समाजातील अनिष्ट रूढींविरुद्ध लढा सुरू होता, तर दुसरीकडे भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांशी टकराव उडत होते. अशा या संघर्षाच्या काळात बहिणाबाईंचा जन्म झळ, तोही एका शेतकरी कुटुंबामध्ये. तत्कालीन रीतीप्रमाणे बहिणाबाईंचे वडील उखाजी महाजन त्यांनी आपल्या मुलीचा-बहिणाबाईंचा विवाह जळगावच्या नथुजी चौधरी यांच्याशी करून दिला. विवाहाच्या वेळी बहिणाबाईंचे वय फक्त १३ वर्षे होते.

बहिणाबाईंचा संसार हा आधी एकत्र कुटुंब पद्धतीतीलच होता, मात्र काही घरगुती कलहामुळे त्यांचे कुटुंब विभक्त झाले. नव्या ठिकाणी नव्याने संसार उभा करण्याला यश येत असतानाच नथुजी यांचे १९१०च्या काळात निधन झाले. त्या वेळी बहिणाबाईंच्या पदरी तीन लेकरे आणि थोडी जमीन या व्यतिरिक्त दुसरे काहीच नव्हते.

शेतातील आणि दैनंदिन कामे करत असताना मन रमवण्यासाठी प्रत्येकच काळात गीतांनी स्त्रियांना मोठा आधार दिला आहे. जात्यावरच्या ओव्या त्याच प्रकारातील. बहिणाबाईंनीसुद्धा या गीतांचाच आधार घेतला. त्यांच्या बहुतेक रचना या अशाच कुठले न कुठले काम करताना त्यांच्या मुखावर अवतीर्ण झालेल्या आहेत. सासर, माहेर, संसार, शेती, व्यक्तिचित्रे अशाच विषयांना बहिणाबाईंनी हात घातलेला आहे. त्या पूर्णतः निरक्षर, पण त्यांच्या कवितांची उंची ही मोठ मोठ्या पंडितांना चाट पाडणारी आहे.

महाराष्ट्राला एक कवी म्हणून माहिती असलेले सोपानदेव चौधरी हे बहिणाबाई यांचे पुत्र. बहिणाबाईंनी ३ डिसेंबर १९५१ रोजी जगाचा निरोप घेतला. त्यानंतर घराची आवरासावर करत असताना सोपानदेव यांना एक वही सापडली. याच वहीमध्ये लहानपणी त्यांनी त्यांच्या आईने गुणगुणलेली गाणी लिहून ठेवलेली होती. १९५२मध्ये सुचित्रा प्रकाशनाने या कविता बहिणाबाईंची गाणी या नावाने प्रकाशित केल्या. (साभार : इंटरनेट)

# रेवदंडा बाजारपेठेत सतत वाहतूक कोंडी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बाजारपेठेत बेशिस्तीने केलेल्या लहान मोठया वाहनांच्या पार्किगने नित्याने वाहतुक कोंडी निर्माण होते. त्यामुळे पार्किगच्या असुविधेने रेवदंडा बाजारपेठेतील वाहतुक कोंडीची समस्या ऐरणीवर असते.

अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला रेवदंडा हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथून वाहनांची जा-ये मोठ्या प्रमाणात आहे. विशेषतः मुरूड तालुका पर्यटनक्षेत्र म्हणून प्रसिध्दीस असल्याने येथून पर्यटक मोठया प्रमाणात येत असतात, त्यांना रेवदंडा मार्गेच मुरूडकडे जा-ये करावी लागते. रेवदंडा बाजारपेठ सुमारे दोन किमी अंतरामध्ये वसलेली आहे, या बाजारपेठेतील रस्ता अंत्यत अंरूद आहे. त्यामुळे वाढत्या वाहतुकीचा ताण रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताला नेहमीच असतो. रेवदंडा बाजारपेठेतील अगोदरच अरूंद असलेल्या रस्ता वाहनांची जा-ये करताना नित्याने वाहने व प्रवासीवर्गाला वाहतुक कोडींच्या समस्येला सामोरे जावे लागते. विशेष म्हणजे रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताला कुठेही पार्किग सुविधा नसल्याने जा-ये करणारा वाहनांना बाजारपेठेत बेशिस्तीने पार्किग केलेल्या वाहनाचा अडथळा होतो व वाहतुक कोंडी निर्माण होते.



रेवदंडा बाजारपेठेत अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यातील गावे, व रेवदंडा पंचक्रोशीतील गावे अवंलबून आहेत, त्यामुळे रेवदंडा बाजारपेठ नित्याने गर्दीचे ठिकाण आहे. येथे बाजारपेठेत खरेदीसाठी नित्याची गर्दी असते, बाजारपेठेतील अरूंद रस्तात मोटरसायकल, रिक्षा, मालवाहतुक टेम्पो, तसेच लहान मोठी वाहने बेशिस्तीने पार्किग केली जातात, त्यामुळे बाजारपेठेतील अरूंद रस्त्याने जा-ये करणाऱ्या मोठ्या बसेस, मालवाहतुक ट्रक यांना अडथळा निर्माण होतो, त्यामुळे वाहतुक कोंडी नित्याने होते. मुख्यः रस्ता अरूंद असल्याने पार्किग समस्यासुध्दा निश्चितच जाणवते. बाजारपेठेतील अरूंद रस्तात पार्किग सुविधा उपलब्ध होत नसल्याने बाजारपेठेत गर्दीच्या वेळी रस्त्यात वाहतुकीची कोंडी निर्माण होते.

रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद रस्ताने दोन मोठी वाहने पास होताना फारच जिकीरीचे असते, शिवाय रस्त्यात उभी केलेली लहान मोठी वाहने वाहनांच्या जा-ये करताना अडथळा निर्माण करतात. या रस्ताने मिनिटागणीत वाहने जा-ये करत असल्याने बेशिस्तीने केलेल्या पार्किगने वाहतुक कोंडी निर्माण होते. रेवदंडा गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कुलदरम्यान नित्याने वाहतुक कोंडीची समस्या असते. विशेषतः केळकर स्टॉप, अर्बन बँक, पारनाका, ते पुढे रेवदंडा हायस्कुल पर्यंत नित्याची वाहतुक कोंडी निर्माण होत असते. रेवदंडा बाजारपेठेतील गोळा स्टॉप ते रेवदंडा हायस्कुल या एक किमी अरूंद रस्त्याच्या अंतरामध्ये कुठेही पार्किग सुविधा नसल्याने ही वाहतुक समस्या निर्माण होते.

रेवदंडा बाजारपेठेतील अरूंद असलेल्या रस्ताला पार्किग सुविधा नसल्यानेच वाहतुक कोंडी होत असल्याचे निदर्शनास येते, बाजारपेठेत खरेदी साठी मोटर सायकल, रिक्षा, मालवाहतुक टेम्पो, तसेच लहान मोठी वाहने येत असतात, त्यांना पार्किग सुविधा अत्यंत गरजेची आहे. पार्किग सुविधा नसल्याने बेशिस्तीने वाहने पार्किग करून ठेवल्याने वाहतूक कोंडी निर्माण होते.

### पार्किंग सुविधेचा प्रश्न सोडविणे गरजेचे

***बाजारपेठेतील नित्याने होत असलेल्या कोंडीने पोलिसांना सुध्दा डोकेदुखी ठरते, नित्याने येथे ट्रॅफिक पोलिसांची नित्यांत आवश्यकता असते. या ट्रॅफिक पोलिसांना रस्त्यात बेशिस्तीने पार्किग केलेली वाहने हटवावी लागतात, त्यावेळी वाहतुक कोंडी सुटते, मात्र तोपर्यंत वाहनांची भली मोठी रांग बाजारपेठेत लागलेली दिसते. रोज व नित्याने रेवदंडा बाजारपेठेत होणारी वाहतुक कोंडी दुर करण्यासाठी संबधीताने पार्कींग सुविधेचा प्रश्न सोडविणे फारच गरजेचे आहे.***

# सण शांततेत साजरे करा -निवृत्ती बोऱ्हाडे

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पोलीस ठाण्यात आगामी सणाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून शांतता कमिटी बैठक शुक्रवारी पार पडली. या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी व पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे म्हणाले की, सण समारंभाच्या माध्यमातून सलोखा निर्माण होतो. कोणताही अनुचित प्रकार न घडता सण शांततेत साजरे करा, असे आवाहन या वेळी माणगाव पोलिसांनी केले. या वेळी विविध विषयांवर चर्चा झाली.

आगामी सण व उत्सव तसेच कायदा व सुव्यवस्था अनुषंगाने धार्मिक जातीय तेढ निर्माण करणाऱ्या जातीय सलोखा हानी पोहोचवणाऱ्या राष्ट्रीय एकात्मतेला बाधा पोहचविणाऱ्या एखाद्या विशिष्ट समाजाला भडकविणाऱ्या कोणत्याही पोस्ट, संदेश सोशल मीडिया द्वारे पोस्ट करू नका किंवा अशा प्राप्त झालेल्या पोस्ट शेअर करू नका. कोणत्याही घटनेच्या पार्श्वभूमी विषयी संपूर्ण पडताळणी केल्याशिवाय आणि त्याबाबत सत्यता पडताळून पाहिल्याशिवाय अशा घटनेबाबत सार्वजनिक रित्या किंवा सोशल मीडियावर विचार व्यक्त करू नका. त्याबाबत समाजामध्ये अफवा पसरू नये किंवा अफवावर विश्वास देखील ठेवू नये.

जातीय सलोखा बिघडेल असे कोणतेही कृत्य करू नये. कोणत्याही धर्माच्या व्यक्तीच्या व्यक्तिगत किंवा सार्वजनिक भावना दुखावतील अशा प्रकारे स्टेटस किंवा पोस्ट सोशल मीडियावर शेअर करू नये किंवा व्हायरल करू नये. आगामी काळामध्ये सर्व धर्मीय सण उत्सव साजरा केले जाणार आहेत. वाहतूक कोंडी व अपघात झाल्यास पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे. आपले राहते परिसरात जास्तीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. वाहतुकीचे नियम पाळावेत, लहान मुलांना वाहन चालवण्यास देऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या.

या बैठकीला रविंद्र मोरे, नगर पंचायत कर्मचारी, रिक्षा चालक, कमिटी सदस्य आदी नागरिक उपस्थित होते.



# कशेळे येथील शिबिरात ४२ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कशेळे येथील पुष्पम संस्कृती रिसॉर्टच्या वतीने माया रक्त केंद्र, बदलापूर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे कर्जत, खालापूर तालुक्यातील ५२१वे रक्तदान शिबिर ठरले.

पुष्पम संस्कृती रिसोर्ट कशेळे येथे करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी पुष्पम संस्कृती रिसॉर्टचे चिराग चोप्रा, विविध विभाग प्रमुख सरफराज खान, अस्मिता कांबळे, विशाल विजापुरे, राजेश यादव, पवन मोडक, शदाब येसीन, राज गांधी, इरफान शेख, जयवंत म्हसे, डॉ. प्रशांत सदावर्ते, आमिर मणियार आदी उपस्थित होते.

रक्त संकलनाचे काम बदलापूर येथील माया रक्त केंद्राचे आनंद भिसे, प्रियांका धैनजे, श्वेता बागुल, राकेश यङके, टेक्निशियन बिपीन सर, पूजा मॅडम, मनिषा भिसे यांनी केले.



# चौलमध्ये मोफत आरोग्य शिबिरास प्रतिसाद

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल शिवसेना आयोजीत मोफत आरोग्य शिबिरास मोठा प्रतिसाद लाभला.

चौल श्री रामेश्वर मंदिराचे सभागृहात वडखळ डोळवी येथील जेएसडब्लू मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिर गुरूवारी झाले. या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ मोठया संख्येने गरजू लाभार्थीनी घेतला.



या मोफत आरोग्य शिबीरास जेएसडब्लू मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. कल्याणी मोरे, प्रिती चव्हाण, विनित पाटील, राहूल पाटील, विनेश पाटील, चित्रांग पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले तर चौल शिवसेनेचे वतीने शिवसेना अलिबाग व मुरूड मतदार संघ महिला संघटक तनुजा घरत, प्राजक्ता मुंबईकर, वर्षा ठाकूर, रूपाली धरणकर, शलाका राउत, स्नेहा लोहार, भुषण घरत,चौल शिवसेना शाखा प्रमुख सिध्देश शेवणईकर, आशिष कंटक, प्रशांत शेवणईकर, जितेंद्र जाधव, निखिल राउत, नितिन राउत, अमित राउत, रणजीत धरणकर आदींनी सहकार्य केले.

# राष्ट्रवादीतर्फे भजन स्पर्धा

## संत शिरोमणी नामदेव भजन मंडळ प्रथम

**मुरूड : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खास महिलांसाठी भजन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.



या स्पर्धेमध्ये मुरूड तालुक्यातील १० भजन मित्रमंडळाने सहभाग घेतला होता. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व मुरूड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्ह्याचे उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, अलिबाग मुरूड मतदार संघाच्या उपाध्यक्ष स्मिता खेडेकर, रायगड जिल्हा सोशल मीडिया उपाध्यक्ष हसमुख जैन, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या वसंती उमरोटकर, वावडूंगी माजी सरपंच अजित कासार, महिला तालुका अध्यक्ष मृणाल खोत आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेतील सर्वित्कृष्ट प्रदर्शन संत शिरोमणी नामदेव भजन मंडळ मुरूड यांनी केल्यामुळे त्यांनी सादर केलेल्या भजनास प्रथम क्रमांक प्रदान करण्यात आला. त्यांना रोख रक्कम दहा हजार रुपये स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र बहाल करण्यात आले. द्वितीय क्रमांक – श्री बल्लाळ विनायक भजनी मंडळ मुरुड याना सात हजार रुपये रोख स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. तृतीय – भैरव प्रासादिक मंडळ याना देण्यात आले त्यांना रोख पाच हजार व प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षीस म्हणून कोटेश्वरी महिला मंडळ व शारदोस्तव भजनी मंडळ याना प्रत्येकी तीन हजार रुपये देऊन गौरवण्यात आले.

# गडब येथे चित्ररथांद्वारे कला सादर

**पेण : प्रतिनिधी**

श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त गोपाळ काल्याच्या दिवशी पेण तालुक्यातील गडब येथे ग्रामस्थांनी दोन चित्ररथांचा समावेश गोविंदा मिरवणुकीमध्ये केला होता. हे चित्ररथ पाहण्यासाठी अनेकांनी गर्दी केली होती.

एक चित्ररथ हा कंसाचा होता तर दुसऱ्या चित्ररथामध्ये नंदाचा राजवाडा सजवून दाखविला होता. दोन्ही चित्ररथांच्या समोर टीपरी नृत्य लहान मुले गोपगीपीकांच्या वेशामध्ये करीत होती. हे दोन्ही चित्र रथ, गावांमध्ये फेरी मारून काळंबादेवी गडब मंदीरासमोर सादर करण्यात आली. यावेळी दोन्ही बाजूला तरूण मुलांनी एका गणवेशात दोन फळ्या तयार करुन ढोल वाद्यायाच्या तालात पथक वाजत गाजत लेझीम नृत्य ही सादर केले. तेथे पुतणा राक्षसीने श्रीकृष्ण बाळास छातीला विष लावून दूध पाजण्याचा प्रसंग दाखविण्यात आला.

आणि याचवेळी बाळरुपी श्रीकृष्णाने पुतना राक्षसीनीच्या छातीला चावा घेवून यमसदनी पाठविण्याचा दृश्य सादर केला. हे पाहून हजारो प्रेक्षक गोविंदा प्रमीनी टाळ्या वाजवून दाद दिली व कौतुक केले.



# हेल्प फाऊंडेशनला मोलाची साथ



**खालापूर : प्रतिनिधी**

कुठेही आणि कोणतीही आपत्तीजनक परिस्थिती उद्भवल्यास हेल्प फाउंडेशनची टीम त्या ठिकाणी तत्काळ धावून जाते आणि मदतकार्य करते असते. या बाबीचा आढावा घेऊन आणि कामगिरीत सातत्य असावे या दृष्टिकोनातून मदत कार्यात आवश्यक असलेल्या संसाधनांची गरज ओळखून जेएसडब्ल्यू खोपोली या कंपनीने मदतीचा हात पुढे केला.

जे एस डब्ल्यू कंपनीचे प्लांट हेड राहुल महाकाल यांनी हेल्प फाउंडेशनच्या प्रतिनिधींकडे वॉटर रेस्क्यूसाठी आवश्यक असलेले साहित्य सुपूर्द केले. त्यावेळी एच.आर. जनरल मॅनेजर अनिल महाजन, डेप्युटी मॅनेजर अतुल शिंदे, सिनियर इंजिनिअर प्रवीण तावडे आदी उपस्थित होते.

हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, विजय भोसले, अमोल कदम आणि हनीफ कर्जीकर यांचेकडून संस्थेच्या कार्यप्रणालीची माहिती जाणून घेत शाबासकीची थाप दिली. भविष्यात या अतुलनीय सामाजिक उपक्रमास आवश्यक असलेली अत्याधुनिक संसाधने पुरवण्याचा संकल्प जाहीर केला.

# पोलादपूर शहरात मंगळागौरी स्पर्धा

## रुक्मिणी ग्रुपने जिंकले विजेतेपद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर शहरातील शिवसेना महिला आघाडी पुरस्कृत स्पर्धेत शहरातील रुक्मिणी ग्रुपच्या महिलांनी विजेतेपदाची २५ हजार रुपये रक्कम आणि ट्रॉफी पटकावली आहे. मंत्री पत्नी सुषमा गोगावले आणि मंत्रीकन्या शीतल गोगावले-कदम, कोमल गोगावले यांच्या आवाहनानुसार शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील शेकडो महिलांनी कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये उपस्थित राहून या स्पर्धेचा आनंद लुटला. या वेळी टीव्ही चॅनलवरील आघाडीच्या अभिनेत्री रेश्मा शिंदे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.



पोलादपूर तालुका शिवसेना महिला आघाडीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या मंगळागौरी स्पर्धेवेळी महिला आघाडी जिल्हाध्यक्षा नीलिमा घोसाळकर, उपाध्यक्षा सपना मालुसरे, रायगड जिल्हा परिषद सदस्या अपर्णा घोसाळकर, प्रेरणा सावंत, सुवर्णा संदेश कदम, अस्मिता पवार, सुमन महाडिक, सिद्दीका लोखंडे व जान्हवी मोरे, नगराध्यक्षा शिल्पा दरेकर, माजी नगराध्यक्ष सोनाली गायकवाड, स्नेहल मेहता, मृगया शहा, गीता दळवी, आशा खेडेकर व चेतना पवार, विकिता सुतार, अर्चना कुंभार, सपना मोदी, नीलम मोरे आदी उपस्थित होत्या.

या वेळी शिवसेना उपजिल्हा संघटक व रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांच्यासह तालुकाप्रमुख निलेश अहिरे हेदेखील उपस्थित होते. भाजपच्या महिला नगरसेविका अंकिता निकम यांचा या वेळी सुषमा गोगावले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी पाच लकी ड्रॉ पध्दतीने महिलांच्या संघांना ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

# वारीमुळे समाजात एकता-विवेक रावकर

**नागोठणे : बातमीदार**

मी वारीला गेलो म्हणजे विशेष काही केले नाही. एकतेचे प्रतिक वारीचे आपल्या समाजावर फार उपकार आहेत. त्या उपकाराची जाणीव ठेवून आपण सर्वांनी वारीला योगदान दिले पाहिजे. वारीने आपल्याला कीर्तनकार, प्रवचनकार, माळकरी, टाळकरी तसेच धारकरीदेखील दिले आहेत आणि त्यांचा योग्य उपयोग करून घेणारे छत्रपती शिवाजी महाराजदेखील या वारीने आपल्याला दिलेले आहेत. वारीमुळेच समाज जिवंत असल्याचे प्रतिपादन नागोठणे ग्रामपंचायतचे माजी सदस्य नाभिक समाजाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विवेक रावकर यांनी केले.

नाभिक समाजाचे थोर संत श्री संत शिरोमणी सेना महाराज यांची पुण्यतिथी बुधवार २० ऑगस्ट रोजी समाजाचे आधारस्तंभ भाईसाहेब टके यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणातील श्री संत ज्ञानेश्वर मंदिरात नागोठणे विभाग नाभिक संघ, महिला आघाडी व संत सेवा मंडळ नागोठणे यांच्या वतीने साजरी करण्यात आली. आषाढी एकादशीनिमित्त प्रथमच नागोठणे पंढरपूर पायी वारी विवेक रावकर यांनी केली. त्याबद्दल नाभिक समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी उपस्थित समाज बांधवांशी संवाद साधताना विवेक रावकर बोलत होते.

या वेळी हभप विजय महाराज शहासने, हभप गजाननमहाराज बलकावडे यांच्यासह नाभिक संघ नागोठणे विभाग अध्यक्ष बाळासाहेब टके, उपाध्यक्ष मिलिंद गुजर, कार्याध्यक्ष शैलेश रावकर, शहर अध्यक्ष सुधाकर निंबाळकर, खजिनदार रविंद्र टके, सचिव दिगंबर खराडे, उदंड रावकर, हरीशभाई टके, शैलेश रावकर, शामकांत नेरपगार, महेंद्र माने, मंगेश गायकवाड, अॅड. श्रीकांत रावकर, मनोज टके, पंकज टके, जयेश टके, अॅड. रमेश जाधव, महेंद्र पवार, विवेक रावकर, जितेंद्र जाधव, संजय टके, विजय टके, संतोष माने, दीपक पवार, राजेंद्र माने, दिपाली टके आदी उपस्थित होते.



## रा.स्व.संघ गाथा

# पनवेलमधील संघ कार्याची वाटचाल

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ साली नागपूर येथे झाली. त्यानंतर हळूहळू ध्येयवादी कार्यकर्त्यांच्या आधारावर संपूर्ण देशात संघकार्य विस्तारले. १९४०च्या सुमारास पनवेल येथे संघाचे काम सुरू झाले असावे. पुढील तीन चार वर्षांत पनवेल उरण सह आजूबाजूच्या काही गावात संघकार्य सुरू झाले.

१९४८ साली संघावर देशव्यापी बंदी आली. ती उठविण्यासाठी संघाच्या स्वयंसेवकांनी शाखा लावून निषेध नोंदविला व अटक करवून घेतली. पनवेल येथे झालेल्या सत्याग्रहात राजाभाऊ वैशंपायन, सदानंद ओझे, दत्ता, पेंडसे, यतिश लोंढे, जगनाडे, खंडागळे, केशवराव डांगरे हे सहभागी झाले होते. १९४९ साली संघावरील बंदी उठली व पुन्हा संघकार्य जोमाने सुरू झाले. गांधीहत्येच्या पार्श्वभूमीवर तसेच अनेक प्रकारच्या गैरसमजातून संघ स्वयंसेवकांना खूप त्रास सहन करावा लागला. १९५५ ते ६५ च्यादरम्यान पनवेल गावात चार ते पाच ठिकाणी शाखा लागत होत्या. तर ग्रामीण भागात पारगाव, पळस्पे, गळसुंदे, अजिवली छोटी जुई, नांदगाव येथे शाखा लागत होत्या. अशाच एका शाखेवर तत्कालीन सरसंघचालक प.पू. गोळवलकर गुरुजी आले होते अशी आठवण श्री. नंदाजी ओझे सांगतात. तेव्हा भर पावसात श्री गुरुजी स्वयंसेवकांबरोबर खेळले होते. तेव्हाचे प्रांत प्रचारक कै. नानाराव पालकर व मोरोपंत पिंगळेसुद्धा पनवेलच्या शाखेवर आले होते. १९७५ पूर्वीच्या संघकामात दामुअण्णा टोकेकर, दादा चोळकर, तात्या पुरोहित, अरविंद हर्षे, सुमंतराव घायाळ हे प्रचारक होते. त्यांच्या हृदय आठवणी आजही अनेक स्वयंसेवक सांगतात. याच काळात कै. चिंतामणराव देवधर, राजाभाऊ भावे, डॉ. नरेंद्र दिघे हे संघचालक होऊन गेले. १९८० नंतर अनेक वर्षे पनवेल येथील उद्योजक श्री. दादा जोशी हे संघचालक होते. राजाभाऊ वैशंपायन यांचे राहते घर हे तेव्हाच्या प्रचारकांचे हक्काचे घर होते. भाऊ पवार, नरुभाऊ काळे, दादा लोंढे म्हणजेच कवी यतिश, माधवराव गांगल, तात्या पटवर्धन हे तेव्हाचे धडाडीचे स्वयंसेवक होते. संघाचा घोष हा तेव्हा आणि आत्तासुध्दा समाजाचे आकर्षण राहिला आहे. पनवेलचा घोष १९६५ सालापासून अस्तित्वात आहे. तेव्हाचे प्रचारक तात्या पुरोहित यांनी घोष उभारण्यात बरीच मेहनत घेतली.

याच सुमारास पनवेलमध्ये प्रवासी सांस्कृतिक मंडळ या नावाने एक संघपूरक काम सुरू झाले. अनेक कारणांमुळे सरकारी नोकर असलेल्या स्वयंसेवकांना उघडपणे संघकार्य करता येत नव्हते. तसेच हे स्वयंसेवक नोकरीसाठी सकाळी ७ ते रात्री ९ पर्यंत बाहेरगावी असत. असे अनेक स्वयंसेवक या कामात जोडले गेले होते. संघाचे कार्यक्रम थोड्या वेगळ्या पध्दतीने ते साजरे करीत असत. श्री.बाळासाहेब भारद्वाज, बापूसाहेब पाटणकर, बाबा खाडे यासारख्या अनेकांचे योगदान या कामात होते.

१९७५-७७ या काळात देशात आणीबाणी पर्व होते. या काळात पुन्हा एकदा संघावर बंदी घालण्यात आली. संघाचे व सहयोगी संस्थांचे हजारो कार्यकर्ते वेगवेगळ्या कारणांसाठी जेलमध्ये बंद होते. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते तेव्हा गुपचूपपणे येऊन कार्यकर्त्यांना भेटत असत. वेगळ्या स्वरुपात संघाचे कार्य तेव्हासुध्दा सुरूच होते. आणीबाणी उठविण्यासाठी संघाच्या सात स्वयंसेवकांनी सत्याग्रह केला. त्यात मी स्वतः, दामू देवधर, शरद उपाध्ये, सदानंद कर्णेकर, अनिल आचार्य, नथुराम गायकर व अनिल म्हात्रे यांचा सहभाग होता. आम्हा सर्वांना दीड महिन्यांसाठी ठाणे येथील कारागृहात ठेवले होते. राजाभाऊ वैशंपायन, व्यंकटेश जोशी, शंकरराव चोरघे, डॉ. दिघे व जयंत भाटे असे पाचजण मिसा कायद्याखाली नाशिक कारागृहात होते. १९७७च्या निवडणुकीत स्वयंसेवकांनी हिरीरीने जनता पक्षाचा प्रचार केला. व लोकशाही सरकार निवडून आले. संघावरील बंदी त्वरित उठविण्यात आली. कारागृहातील स्वयंसेवकांना सोडण्यात आले पनवेलमध्ये त्यांच्या स्वागताची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. या दोन वर्षांत श्री नरुभाऊ काळे व श्री. केशवराव केळकर यांनी गुप्तपणे निधी संकलन केले व मिसाखाली अटक असलेल्या कार्यकर्त्यांच्या घरी ही मदत पोहचविण्यात येत असे. आणीबाणीनंतर तत्कालीन सरसंघचालक प.पू. बाळासाहेब देवरस पनवेल येथे आले होते. तेव्हाचे खासदार श्री. दि. बा.पाटील यांना भेटण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी गेले होते.

याच कालावधीत दोन अभियाने संपूर्ण देशात स्वयंसेवकांनी राबविली. १९६७ साली विवेकानंद शीलास्मारकासाठी घरोघर जाउन निधीसंकलन केले. तर १९७३ साली शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३०० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील प्रत्येक घरात शिवसंदेश पत्रिका देण्यात आली. पनवेल तालुक्यात सुध्दा प्रत्येक गावातील प्रत्येक घरात हे पत्रक देण्यात आले. १९८३ साली पुण्यातील तळजाई येथे एक मोठे प्रांतस्तरिय शिबिर आयोजित केले होते. या शिबिरास संपूर्ण महाराष्ट्रातून ३५००० स्वयंसेवक पूर्ण गणवेशात उपस्थित होते. या तीन दिवसीय शिबिरासाठी पनवेलमधून १०० जण गेले होते.

अगदी अलीकडे म्हणजे २००७ साली पनवेलच्या कर्नाळा स्पोर्टस् क्लबच्या मैदानावर कोकण प्रांतातील घोषवादकांचे शिबिर आयोजित केले होते. त्यासाठी ७७० घोषवादक उपस्थित होते. प्रसिद्ध संगीतकार श्री. श्रीधर फडके हे त्याचे वर्गाधिकारी होते. त्याच्या समारोपाचा कार्यक्रम खूपच दिमाखात पार पडला.

पनवेलमध्ये संघाचे कार्य विकसीत होत असतानाच सहयोगी संस्थांचे कार्य, सुद्धा हळूहळू विस्तारत गेले. १९५४ साली भारतीय जनसंघाची स्थापना पनवेलमध्ये झाली. ३०-४० जणांच्या उपस्थितीत महाजन वाडी येथे हा उद्घाटनाचा कार्यक्रम झाला. त्यासाठी (कै.) अटलबिहारी वाजपेयी हे आले होते. श्री. नाना थोरात यांची पहिले शहर अध्यक्ष म्हणून निवड झाली. पुढील काळात मोरूभाऊ पटवर्धन, बिहारीभाई शहा, रवी शर्मा, शशीकांत बांदोडकर, डॉ. प्रभाकर पटवर्धन यांनी हे कार्य हिरीरीने पुढे नेले.

१९५८-५९च्या सुमारास नेरे येथील बापूराव मोकाशी यांनी धूतपापेश्वर कारखान्यात भारतीय मजदूर संघाचे काम सुरू केले. १९६४च्या सुमारास वीज कर्मचारी पोस्ट ऑफिस येथे मजदूर संघाचे कार्य सुरू झाले. पनवेलमधील दोन सिनेमागृहात भारतीय मजदूर संघाची संघटना होती. काही बँका व एलआयसीमध्ये सुद्धा कामाला सुरुवात झाली.

१९७३मध्ये पनवेलमध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कामाला सुरुवात झाली. श्री. रमेश जोशी, गजानन जुईकर यांनी सुरुवातीच्या काळात तर नंतरच्या काळात अविनाश कोळी व गणेश कोळी यांनी हे काम पुढे नेले.

१९८०च्या सुमारास पनवेलमध्ये वनवासी कल्याण आश्रमाचे काम सुरु झाले. प्रथम श्री. माधवराव फडके व नंतरच्या काळात अप्पा अग्रेसर यांनी पूर्ण वेळ काम केले. नंतर खानदाट काका व काकूंनी आश्रमाचे काम केले. श्री. नरुभाऊ काळे, श्रीराम सहस्त्रबुद्धे, उदय टिळक, सुदाम पवार यांनी हळूहळू कार्यकर्त्यांचा संच निर्माण केला. श्री.व्ही. जी. जोशी यांचासुद्धा उल्लेख करणे आवश्यक आहे. सर्व प्रथम शिरढोण येथे वनवासी विद्यार्थ्यांचे वसतीगृह होते.

नंतर ते मोरबे येथे स्थलांतरित झाले. सध्या हे वसतीगृह चिंचवली येथे आले. सुमारे ३० विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. श्रीमती सुमनताई फडणवीस यांनी १५-२० महिलांना एकत्र केले व आश्रमाच्या कामाला प्रवृत्त केले. वनवासी पाड्यांवर जाऊन हळदी कुंकवाचे कार्यक्रम व आरोग्य शिबिरे आयोजित करीत असत.

१९७०मध्ये पनवेल येथे राष्ट्र सेविका समिति चे काम सुरू झाले. कै. सुमती सहस्त्रबुद्धे व कै. मालती मुजुमदार यांनी हे काम सुरू केले २००५ पर्यंत हे काम सुरू होते नंतरच्या काळात सुप्तावस्थेत असलेले हे काम २०१५ मध्ये पुन्हा सुरू झाले. सध्या पनवेल तालुक्यात पाच शाखा आहेत.

पनवेलमधील डॉ. प्रभाकर पटवर्धन हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. १९६४च्या सुमारास ते पनवेलला आले. ते निष्णात सर्जन होते. १९६७ साली त्यांनी स्वतःचे रुग्णालय सुरू केले. भारतीय जनसंघ, वनवासी कल्याण आश्रम या संस्थांचे ते मार्गदर्शक होते. १९९६ च्या सुमारास त्यांची जिल्हा संघचालक म्हणून नियुक्ती झाली, परंतु १९९७ साली त्यांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी कै. नीलाताई पटवर्धन यांनी रुग्णालयाची वास्तू व त्यांचे राहते घर रा.स्व.संघ जनकल्याण समितीला दान दिले. या रुग्णालयाचे नूतनीकरण २००५ साली पूर्ण झाले. आता येथे चार मजली इमारत दिमाखात उभी आहे. पटवर्धन रुग्णालयात अन्य सेवांबरोबरच डायलिसीस सेंटर चालवले जाते. अतिशय कमी खर्चात रुग्णांचे डायलिसीस केले जाते. दर महिन्याला सुमारे ७०० डायलिसीस तेथे होतात.

१९८०च्या सुमारास विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कामाला सुरुवात झाली. श्री. दादा वेदक श्री. शशिकांत करंदीकर हे वारंवार पनवेल येथे येत असत. रामजन्मभूमी आंदोलनात वेगवेगळे कार्यक्रम संपन्न झाले. अयोध्येत झालेल्या पहिल्या कारसेवेसाठी सुमारे ८० जण तर दुसऱ्या कारसेवेसाठी ४५ जण गेले होते. शीलापूजनाचे कार्यक्रम सुमारे ५० गावांत घेण्यात आले. दोन्ही कारसेवांमध्ये कुंभारवाडा व कोळीवाडा येथील काही तरुण गेले होते. तसेच पनवेल परिसरातील काही गावातील तरुणांचासुद्धा कारसेवेत सहभाग होता.

जनकल्याण समितीची एक अभ्यासिका २००७मध्ये कोळीवाडा येथे सुरू झाली. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची जागृती होत असतानाच तेथील कोळी बांधवांमध्ये जनजागृतीचे विविध कार्यक्रम घेण्यात आले. व्यसनमुक्ती, स्वच्छता, लहान मुलांसाठी आरोग्य शिबीर, विविध विषयांवर व्याख्याने असे कार्यक्रम मागील १० वर्षांत तेथे होत आहेत.

१९९८मध्ये पनवेलला संस्कारभारतीचे कार्य श्री. अजय भाटवडेकर व सौ. मानसी कान्हेरे यांनी सुरू केले. १९९९मध्ये सहकारभारतीच्या कामाला विजय भिडे व अमित ओझे यांनी सुरुवात केली. मागील पाच वर्षांत भारत विकास परिषद व संस्कृत भारतीचे कामसुद्धा सुरू झाले आहे. याच सुमारास आयुर्वेद व्यासपीठ, लघु उद्योग भारती या संस्थांचे काम सुरू झाले. सुमारे २५ वर्षांपासून देहरंग येथे सत्कर्म श्रद्धाश्रय हे वसतीगृह सुरू आहे. परिसरातील वनवासी समाजाचा विकास डोळ्यासमोर ठेवून हे कार्य सुरू आहे. कुरूळकर बहुउद्देशीय वसतीगृह हे मागील १० वर्षात सुरू झाले आहे. मतिमंद व कर्णबधिर मुला-मुलींसाठी हे वसतीगृह आहे.

कोणत्याही संस्थेच्या विकासासाठी व स्थिरतेसाठी कार्यालयाची गरज असते १९५० च्या सुमारास राजाभाऊ वैशंपायन यांच्या वाड्यात संघाचे कार्यालय होते. प्रचारकांचा निवास तेथेच असे. १९८४ पर्यंत कार्यालय या भाड्याच्या जागेत होते. १९९० च्या सुमारास यशोमंगल बिल्डिंग मध्ये जनहित संवर्धक मंडळाच्या जागेत संघाचे कार्यालय सुरू झाले. पनवेलचा भौगोलिक विस्तार जसजसा वाढत गेला तसतशी ही जागा सुद्धा कमी पडू लागली. कोकण प्रांताच्या दृष्टीने असलेले पनवेलचे महत्त्व लक्षात घेता आणखी एका मोठ्या वास्तूची गरज होती. नवीन पनवेलमध्ये डॉ. जोगळेकरांची जागा जनहित संवर्धक मंडळाने विकत घेतली व विकसित केली. या तीन मजली कार्यालयात प्रचारकांचा निवास असतो. विविध बैठका होतात तसेच सेवाकार्येसुद्धा होतात.

१९८० नंतर पनवेलचा भौगोलिक विस्तार झपाट्याने होत आहे. नविन पनवेल, करंजाडे, खांदेश्वर, कळंबोली, कामोठे व खारघर ही आधुनिक नगरे विकसित झाली आहेत. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील हिंदू समाजाला संघटित करणे हे एक मोठे आव्हान आहे. सध्या या क्षेत्रात तरूण, बाल व प्रौढांच्या २९ शाखा नियमितपणे लागतात. व तेवढीच साप्ताहिक मिलनेसुद्धा भरतात. हल्लीच्या गतिमान जीवनात या नगरांमध्ये काम वाढविणे हे आव्हानच आहे. पर्यावरण, सामाजिक समरसता, हिंदू जागरण, कुटुंब प्रबोधन, पूर्वांचल विकास अशा विविध आघाड्यांवर काम होणे अपेक्षित आहे. संघाच्या कार्यपद्धतीतून तयार होणाऱ्या ध्येयवादी कार्यकर्त्यांच्या माध्यमातून या सर्व कामांना गती देता येईल ही अपेक्षा आहे.

**-सुहास सहस्त्रबुद्धे**



---

## श्रावणात मी हिरवा झालो

आभाळाला देत गवसणी
पावसात मी हिरवा झालो
कडकडून मग तिला भेटलो
श्रावणात मी हिरवा झालो /धु /
हिरवी झाडे, हिरवी शेती,
हिरवी सारी धरणी झाली
नवनवतीचे रूप आगळे,
नवमेघांचे अमृत प्याली
बाग मनाची इतकी फुलली
अंगणात मी हिरवा झालो
कडकडून मग तिला भेटलो,
श्रावणात मी हिरवा झालो /१/
लगबग लगबग गाव कुसाला,
सळसळ सळसळ रान मळ्याला
येती ललना जाती ललना,
आग लागते शेत तळ्याला
चिंब मनाच्या चिंब गोपिका,
वावरात मी हिरवा झालो
कडकडून मग तिला भेटलो,
श्रावणात मी हिरवा झालो /२/
रिमझिम रिमझिम, प्रेमळ धारा,
वारा सारा उधाणलेला
पदर राहिना थाऱ्यावरती,
तो मदनाने झोका केला
ओठ ओलसर थेंबामधुनी,
अंतरात मी हिरवा झालो
कडकडून मग तिला भेटलो,
श्रावणात मी हिरवा झालो /३/



-यशवंत पगारे, बदलापूर



## श्रावण मास

आला आला श्रावण मास
सुंगध मोहितो वना मनासू
आल्या आल्या भावण सरी
पडती हिरव्यागार शालू वरी
चोहिकडे स्वच्छंदी ऊन पडे
सरीवर सर घेऊन आनंदाने बागडे
दरीदरीतून तेरडा रंगला फूलला
पाखरांच्या इवल्याश्या गुजगोष्टीत रमला
ऊन पाऊस झिंमा फुगडी खेळती
इंद्रधनुष्य आकाशी तोरण बांधती
रिमझिम तर कधी पावसाला येतो जोर
पिसारा फुलवून नाचतो तो सुंदर मोर
आली नागपंचमी, गोकुळाष्टमी, मंगळागौर
सुहासिनी खेळतील फुगडी आणि गोलगोल फेर
सण नारळी पौर्णिमेचा रक्षाबंधनाचा आला
लेक येता माहेरी श्रावण मास हा सजला



-वर्षा विनायक वाणी, पनवेल




## काळे मेघ दाटून आले

काळे मेघ दाटून आले
डोंगरावरी दाटूनी आले
काळे मेघ रे चमचम करी त्यात
विजेची चंदेरी रेघ रे
धरणीस भेटाया आले घन ओथंबून
काळे कुट्ट झाले नभ, जलद धारेतून
कोसळू लागले घरावरी मोतियांचे थेंब
पावसाच्या रेघांत धरणी झाली ओली चिंब
हिरवा तो डोंगर -अन हिरवे रानवन
हिरवे गालीचे पाहुनिया आनंदले मन
सैराट होऊनी पवन-गात तरणे येई
सुशीलच्या मनाला आनंद भारी होई
दर्या खोऱ्यातुनी खळखळ वाहे पाणी
फांदीवरी बसुनी पक्षी गाती गोड गाणी



-चंद्रकांत देवराम कडू, उरण

## झाडे लावा जीवन फुलवा

पर्यावरणी अपुले नाते गर्भामध्ये जडलेले
ऋण घेउनी तेच मग शिरी जीवन अवघे घडलेले
या जन्मातच व्हा उतराई कर्तव्याला चुकू नका
पृथ्वी अपुली माता आहे, त्या वात्सल्या विसरू नका
प्रदूषणाचा वेढा दिसतो चारी बाजू पडलेला
कारण याचे मानव आहे वागणुकीने चुकलेला
दुष्परिणामी सोसायाचा त्रास मानवा तुलाच ना
धडा शिकवला आपत्तींनी दोष कुणाला द्यावा ना
प्रत्येकाने झाडे लावा अन् संवर्धन गरजेचे
आपोआपच तापमान मग कमी होतसे पृथ्वीचे
झाडांवरती जीवन अपुले कधी न विसरा सर्वांनी
प्रदुषणकारी संकट रोखा, घातक सवयी डावलुनी
किती योजना सरकारी अन् निसर्गप्रेमी तत्पर ते
अनेक उपक्रम राबविती जे पर्यावरणा पोषक ते
या देशाचे सुज्ञ नागरिक म्हणून जाणू दायित्वा
सतर्क राहू आपण सारे या भूमीच्या भवितव्या
निसर्ग रक्षण करणे अपुल्या आयुष्याचे ध्येय असे
जीवन अवघे व्हावे त्याने साधे-सोपे सुखमयसे
वृक्ष लावता होईल सहज मानव जीवन सुसह्यसे
वसुंधरेसह सर्व चराचर बनेल सुंदर, निर्मळसे



-विशाखा विजय पाटोळे, रत्नागिरी

## पाऊस


आल्या पावसाच्या धारा
पावसाच्या धारांनी
हिरवे झाले रान
नदी, नाले, झरे, धबधबे
वाहू लागले छान
हिरवे डोंगर घाटही हिरवे
पाऊस धारा झेलीत जाती
रान पाखरे बरे
पाऊस धारा घेऊन येती
सणाच्या त्या वाऱ्या
दिंड्या पताका हाती घेऊन
नाचत येती माहेरवाशिणी साऱ्या
गवताचे ते रोप पोपटी
भाताचे ते रोप कोवळे
पाऊस धारा झेलित
खेळ खेळती आल्या पाऊस धारा



-अचला पाटील, अलिबाग

## बाप्पाच्या आगमनाची सुरू झाली तयारी...

बाप्पाच्या आगमनाची
सुरू झाली तयारी.....
त्याच्या ओढीने गावाकडची
वाट धरे चाकरमानी.......
फळं, फुलं, हार, सजावटीचे
साहित्य खरेदी करण्यासाठी
लोकं जमली सारी......
उकडीचे मोदक, नैवद्याची
लगबग सुरू झाली........
तिसऱ्या दिवशी बाप्पासोबत
विराजमान होई गौराई.......
नव्या साडीने सजवून
खणा-नारळाने तिची
ओटी भरली जाई.......
पाचव्या दिवशी पुढच्या वर्षी
लवकर या असं म्हणत
त्याचे विसर्जन होई........
जाताना सर्वांना तो आपला
आशीर्वाद देऊन जाई ........



-बेला गुजर

## गणेशमूर्ती कार्यशाळांतून पर्यावरणाविषयी जागरूकता

**नवी मुंबई :** शालेयस्तरावर शाडू मातीच्या मूर्ती बनविण्याच्या प्रशिक्षण कार्यशाळा शाळांमध्ये घेण्यात येत आहेत. अशाच प्रकारच्या कार्यशाळा कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, दिघा कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये राबविण्यात आल्या.

यामध्ये कोपरखैरणे विभागात कोपरखैरणे गाव शाळा क्र.३६ व १२२ मध्ये लर्निंग लिंक फाऊन्डेशन या सेवाभावी संस्थेच्या सहयोगातून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा उत्साहात झाली. यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी विद्यार्थ्यांनी स्वत:च्या हातांनी गणपती बाप्पा साकारला.

# श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात आंतरशालेय स्पर्धा








**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उरण तालुक्यातील द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात शनिवारी (दि.२३) आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या विद्यालयांमध्ये करण्यात येत आहेत. या मध्ये जवळपास शंभरहुन अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडल्या. त्यामध्ये शो अँड टेल कॉम्पिटिशन, ॲड मॅड शो, माईम ॲक्ट, लिप्पन आर्ट या प्रकारच्या स्पर्धा समाविष्ट करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेनिमित्त माधुरी प्रभू (माजी प्राचार्या, द्रोणागिरी इंग्रजी माध्यम शाळा उरण) आणि शमा म्हात्रे (ग्रीन हिल पब्लिक स्कूलच्या प्रशासक) यांची परीक्षक म्हणून उपस्थिती होती. तसेच सअर्चना ठाकूर (संस्था मंडळ सदस्य), विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, हर्षाली घरत व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे तसेच इतर सर्व विद्यालयांचे शिक्षक वृंद, पालक शिक्षक प्रतिनिधी आदी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले.

# ‘जेएसडब्ल्यू’च्या फेज-३ प्रकल्पाला अनेकांचा पाठिंबा

पेण : प्रतिनिधी

पेण तालुक्यातील वडखळ-डोलवी परिसरात असणाऱ्या जेएसडब्ल्यू कंपनीच्या फेज-३च्या विस्तारीकरणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने जेएसडब्ल्यू जेटी धरमतरजवळ जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले होते. ही जनसुनावणी यशस्वीरित्या पार पडून कंपनीच्या विस्तारीकरणाला पंचक्रोशीतील अनेक नागरिकांचा पाठिंबा असल्याचे जाहीर करण्यात आले.

जनसुनावणी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ऋतुजा भालेराव, पेण प्रांताधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. दुपारच्या दरम्यान सुरू झालेल्या कंपनीच्या जनसुनावणीत जेएसडब्ल्यू कंपनीचे




जनसुनावणी यशस्वी



अधिकारी ज्योतींद्र देशमुख व विवेक कुलकर्णी यांनी कंपनीच्या विस्तारीकरणासह प्रदूषणासंदर्भात कंपनीने आजतागायत केलेल्या पेण, नागोठणे, अलिबाग या भागातील विकासकामांबाबत तसेच येणाऱ्या नियोजनाबाबत उपस्थित जनतेसमोर अहवाल मांडला व होत असलेल्या विस्तारीकरणात कंपनी येथील भागांमध्ये अधिकाधिक विकास करण्याच्या दृष्टिकोनातून काम करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर सुनावणीसाठी आलेल्या लोकांकडून मत मांडण्यात सुरुवात झाली.

या वेळी राजू मोकल, योगेश पाटील, मिलिंद पाटील, संतोष म्हात्रे, तुळशीदास कोठेकर, परशुराम म्हात्रे, राजा केणी, दिलीप भोईर आदींसह आजी, माजी सरपंच उपसरपंच, स्थानिक राजकीय लोकप्रतिनिधी यांनी येणाऱ्या प्रकल्पाचे स्वागत करून प्रकल्प वाढला तरच येथील रोजगार वाढणार आहे. आजपर्यंत कंपनीने या भागासाठी चांगल्या सुविधा दिल्या असून या जनसुनावणीला जाहीर पाठिंबा असल्याचे दर्शविले आहे. शिवसेना ‘उबाठा’चे प्रसाद भोईर यांनीही निवडक सूचना करीत प्रकल्पाला पाठिंबा असल्याचे सांगितले तसेच मनसेचे संदीप ठाकूर यांनी नव्या प्रकल्पात कंपनीने स्थानिक तरुणांना सामावून घेण्यात यावे, असे सांगून प्रकल्पाला पाठिंबा दिला.

सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, नंदा म्हात्रे, कुंदा गावंड, संतोष ठाकूर, चैतन्य पाटील यांच्यासह काही नागरिकांनी आपल्या हरकती नोंदविल्या असता या वेळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते, परंतु उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी उपस्थितांचे म्हणणे ऐकून ज्यांना हरकती नोंदवायच्या आहेत त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे सोमवार, मंगळवारी लेखी स्वरूपात मान्य मांडावे, असे आवाहन करून जनसुनावणी यशस्वीरित्या पार पाडली.

या जनसुनावणीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पेण डीवायएसपी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, दादर सागरी पोलीस निरीक्षक संजीवकुमार ब्राह्मणे यांच्याकडून मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## लीड स्कूलमध्ये विद्यार्थी परिषद गठीत



माणगाव : बातमीदार

माणगाव येथील लीड स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेची स्थापना लोकशाही प्रक्रियेद्वारे करण्यात आली. या कार्यक्रमात माणगाव पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक मीरा लाड यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थी परिषदेचा शपथविधी झाला.

एपीआय मीरा लाड यांनी शाळेतील शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना परिषद सदस्यांना त्यांचे कर्तव्य आणि जबाबदाऱ्या समजावून सांगितल्या. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच लोकशाही मूल्यांची रुजवणूक केल्याबद्दल शाळेचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी नेतृत्वगुण आत्मसात करून जबाबदारीने काम करावे, असेही त्या म्हणाल्या.

शाळेचे प्राचार्य बसवराज जागाये यांनी सांगितले की, परिषदेसाठी निवडणूक प्रक्रिया ही पूर्णपणे मतदानाच्या आधारे झाली असून सर्व मतदानाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी मतदान करून विद्यार्थी परिषदेची निवड केली.

या कार्यक्रमासाठी मंदार चव्हारकर, आदित्य महाडिक, अभिश्री पालकर, सचिन गुप्ता, प्राची लोखंडे, निकिता उभारे, निशा महागांवकर यांच्यासह शिक्षक व कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## कर्जतमध्ये कृष्णाची पालखी मिरवणूक

कर्जत : प्रतिनिधी

कर्जत शहरातील श्री राधाकृष्ण व मारुती मंदिर सेवा संस्थानच्या वतीने मथुरेच्या प्रथेनुसार श्रीकृष्ण जन्माष्टमी नंतर सहा दिवसांनी कृष्णाची पालखी मिरवणूक काढण्यात येते. यंदाही ढोल पथकाच्या तालावर पालखी निघाली.

या वेळी अध्यक्ष शिवकिशोर गुप्ता, उमाशंकर गुप्ता, सचिव शिवलाल गुप्ता, खजिनदार शिवसेवक गुप्ता, सतीश गुप्ता, सूर्यकांत गुप्ता, स्वप्नील गुप्ता, अमित गुप्ता, कृपाराम लोवन्सी, पिंटू गुप्ता आदींसह बंधू, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर रात्री भजन करून महाप्रसादाने सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## गणेशभक्तांचा प्रवास होणार सुकर!



### महामार्गावर पोलीस तैनात; माणगावमध्ये विशेष नियोजन

माणगाव : प्रतिनिधी

मुंबई-गोवा महामार्गावर रायगड पोलिसांचे नियोजन आणि ठिकठिकाणी पर्यायी मार्ग काढून वाहतूक कोंडीचा प्रश्न यंदा सोडवण्यासाठी रायगड पोलीस सज्ज झाले असून त्यांचा ताफा महामार्गावर तैनात करण्यात आला आहे. त्यामुळे गणेशभक्तांच्या प्रवासातील विघ्न दूर होणार आहे.

माणगाव परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून खबरदारीचा उपाय म्हणून चार दिवस गणेशोत्सवापूर्वीच येथील बाजारपेठेतील महामार्गालगतची अतिक्रमणे हटवण्याची मोहीम नगरपंचायत व पोलीस यांनी हाती घेतली आहे तसेच दुभाजक बसविण्याचे काम चालू झाले आहे.

सर्वांचा आवडता गणेशोत्सव भाविक मोठ्या उत्साहाने साजरा करतात. याचे वेध व आतुरता लागलेली असते. पण कोकणात मोठ्या प्रमाणावर जाणाऱ्या चाकरमान्यांना मुंबई-गोवा महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे गणेश चतुर्थीला वेळेवर घरी पोहचता येत नाही. त्यामुळे अनेकांचा हिरमोड होतो.

या पार्श्वभूमीवर यंदा रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्गाला पर्यायी रस्त्यांचा वापर करून महामार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करता येईल याचे नियोजन केले आहे. पर्यायी मार्गावरून वाहतूक करून कोकणात व तळकोकणातील प्रवासी, नागरिक गणेशभक्तांना या मार्गाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जेणेकरून लांब पल्ल्याच्याभक्तांना वेळेत व सुखरूप आपल्या घरी वेळेवर पोहचता येईल.

#### असा असेल बंदोबस्त

मुंबई-गोवा महामार्ग क्र. ६६ तसेच पाली फाटा-खोपोली-वाकण राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ ए वरून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, कल्याण, पुणे आदी ठिकाणावरून रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी इथे गावी गणेशोत्सवाकारिता मोठ्या प्रमाणामध्ये कोकणातील गणेशभक्त जात असतात या गणेशभक्तांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी रायगड जिल्हा पोलीस दलामार्फत अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली सहा उपविभागीय पोलीस अधिकारी, १० पोलीस निरीक्षक, ५२ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक, ७६ वाहतूक पोलीस कर्मचारी, ४०५ पोलीस स्टाफ असे खारपाडा ते कशेडी घाटापर्यंत महामार्गावर पोलीस तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय ठिकठिकाणी वाहतूक मदत केंद्र, १० सुविधा केंद्र, महामार्गावर क्रेन, जेसीबी, ॲम्बुलन्स खासगी व सरकारी तयार ठेवण्यात आली आहेत तसेच स्वयंसेवकही नेमण्यात आले आहेत.

मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर, माणगाव, लोणेरे बाजारपेठेत वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे तसेच दुभाजक बसवून वाहतूक एकेरी केली आहे. माणगाव तालुक्यात उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्पराज सूर्यवंशी यांनी महत्त्वाच्या ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्याचे नियोजन केले आहे. माणगाव व इंदापूर बायपासचे काम अपूर्ण असल्याने येथे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महामार्गालगत बसणारे हातगाडे, फळभाजी विक्रेते, फुटपाथवरील व्यावसायिक यांना तात्पुरते हटवण्यात येत आहे. माणगावात येणाऱ्या एसटी आणि इतर वाहनांसाठी वेगळ्या पार्किंगची सोय करण्यात आली आहे. जुन्या पंचायत समितीच्या मैदानात तसेच फराग टॉकीज परिसरात वाहनतळाची व्यवस्था केली असून बसस्थानकात गर्दी होऊ नये म्हणून बसेस बाहेरील ठिकाणीच थांबे ठेवण्यात आले आहेत. गणेशभक्तांना प्रवासादरम्यान अडचण भासू नये म्हणून महामार्गावर इंदापूर येथील हॉटेल माही व माणगाव गारळ येथील हॉटेल आनंदभुवन येथे सुविधा केंद्र उभारण्यात आली आहेत. या केंद्रांमधून माहिती, विश्रांती तसेच आपत्कालीन मदत उपलब्ध होणार आहे.

या संदर्भात माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले आहे. रायगड पोलीस प्रशासनाचे हे सर्वांगीण नियोजन गणेशभक्तांच्या सोयीसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. गर्दी, कोंडी, अपघात किंवा अन्य कोणत्याही अडचणींवर त्वरित प्रतिसाद मिळावा यासाठी संबंधित पोलीस ठाण्याशी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

** कोकणात जाणाऱ्या भक्तांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. मुंबईहून येणाऱ्यांनी खोपोली-खालापूर-पाली-निजामपूर-बोरवाडी-पाचाड-महाड या मार्गाचा पर्याय स्वीकारावा, तर म्हसळा, श्रीवर्धन, हरिहरेश्वर या भागात जाणाऱ्यांनी इंदापूर-तळा-तळेगाव-साई मार्गाचा वापर करावा.*

** सुरक्षेच्या दृष्टीने महामार्गावर सरकारी व खासगी ॲम्बुलन्स उपलब्ध ठेवण्यात आल्या आहेत. वाहन बंद पडल्यास किंवा अपघात झाल्यास तत्काळ ती वाहने बाजूला करण्यासाठी जेसीबी, क्रेन यांचीही यंत्रणा सज्ज आहे.*

## सणासुदीत काळजी व दक्षता घ्या

### नागोठणे पोलीस अधिकारी सचिन कुलकर्णीचे आवाहन

नागोठणे : बातमीदार

सण-उत्सव गुण्यागोविंदाने व खेळीमेळीच्या वातावरणात साजरे करा. कुठेही गालबोट लावू नका. अफवांवर विश्वास ठेवू नका. शहानिशा करा, असा मौलिक सूचना देऊन सणासुदीला कोणतेही चुकीचे कृत्य होणार नाही याची काळजी व दक्षता घ्या, असे आवाहन नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी केले.



गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद सणाच्या अनुषंगाने नागोठणे पोलीस ठाण्यात शुक्रवारी (दि. २२) बैठक घेण्यात आली. त्या वेळी कुलकर्णी बोलत होते. या बैठकीस पोलीस उपनिरीक्षक नरेश थळकर, हवालदार स्वप्नील भालेराव, अथर्व पाटील, नागोठण्याचे माजी सरपंच विलास चौलकर, भाजप नेते सोपान जांबेकर, उपसरपंच अकलाख पानसरे, प्रियदर्शनी संस्थेचे अध्यक्ष सिराज पानसरे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, सामाजिक कार्यकर्ते इम्रान पानसरे, गणेश घाग, प्रमोद नागोठणेकर, शांतता कमिटी सदस्य नंदा गायकवाड, निलोफर पानसरे, कांचन शेळके, निवृत्त शासकीय अधिकारी के.के. कुथे, पोलीस पाटील, अदिती ठाकूर, महेश शिरसे, विजय पाटील, मुजफ्फर कडवेकर, वसीम बेडेरे, संतोष जैन आदींसह नागरिक उपस्थित होते.

पोलीस अधिकारी कुलकर्णी पुढे म्हणाले की, सण-उत्सवांच्या कालावधीत कोणत्याही प्रकारे जातीय तणाव अथवा जातीय वाद निर्माण होणार नाहीत याची सर्वांनी दक्षता घ्यावी. सोशल मिडियावर वादग्रस्त मेसेज टाकू नयेत. तसे कोणी करत असेल तर त्यास वेळीच आवर घालावा व त्याची माहिती पोलिसांना द्यावी. सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, रस्त्यामध्ये अथवा गर्दीच्या ठिकाणी वाहन पार्किंग करू नये, गणेशोत्सव मंडळांनी आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, मंडपात सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, गणेशमूर्ती स्थापना व विसर्जन मिरवणूक वेळेत सुरू करून वेळेतच समाप्त करावी, डीजेसारख्या मोठ्या आवाजाचे वाद्यांचा वापर करू नये, पारंपरिक वाद्यांचा वापर करण्यात यावा, सार्वजनिक मंडळाच्या ठिकाणी दिवसा व रात्री अशा दोन शिफ्टमध्ये स्वयंसेवक ठेवावेत व त्यांची यादी पोलीस ठाण्यात द्यावी.

## बहिरेश्वर मंदिरात पारायणाचा समारोप

नागोठणे : बातमीदार

पेण तालुक्यातील शिहू येथील श्री बहिरेश्वर जोगेश्वरी मंदिरात काशीखंड ग्रंथाचे पारायण गेले महिनाभर करण्यात आले. त्याचा समारोपही भक्तीमय वातावरणात झाला.

हिंदू संस्कृतीमध्ये पवित्र महिना असलेल्या श्रावण महिन्यात केलेली उपासना आध्यात्मिक दृष्टीने लाभदायक ठरते. म्हणूनच ग्रामीण भागात व्रतवैकल्यासोबतच ग्रंथ वाचन व विविध पोथींचे पारायण केले जाते. पूर्ण महिना या भक्तिरसात सर्व चिंब होऊन जातात. एक व्यक्ती ग्रंथ वाचन करते, ज्येष्ठ व्यक्ती निरूपण करते आणि त्यांच्या भोवती बसलेले श्रोते भक्तिभावाने श्रवण करतात असे सुंदर चित्र गावागावातील मंदिरांमध्ये पहावयास मिळते. अशीच परंपरा असलेल्या शिहू येथील श्री बहिरेश्वर जोगेश्वरी मंदिरात काशीखंड ग्रंथाचे पारायण गेले महिनाभर करण्यात आले होते. याचा समारोप सोहळा २१ ऑगस्ट रोजी झाला.

या वेळी ग्रंथ वाचनासाठी व निरूपणासाठी लाभलेले प्रवक्ते रघुनाथ खाडे, वसंत मोकल, भास्कर म्हात्रे, चंद्रकांत कुथे, जानू कुथे, के.के. कुथे, जोमा कोकाटे, ज्ञानदेव म्हात्रे, महादेव म्हात्रे, देविदास भुरे, गणेश मोकल, नारायण मोकल, आकाश म्हात्रे, मंजुळा म्हात्रे, रुक्मिणी म्हात्रे, भारती मोकल, वनिता म्हात्रे, खेळ्या म्हात्रे, यांचा समावेश होता, तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ मंडळ व युवक मंडळ शिहू यांनी विशेष मेहनत घेतली.

## नाभिक समाजातर्फे संत सेना महाराज पुण्यतिथी

### कोलाड येथे भक्तिमय कार्यक्रम; शैक्षणिक साहित्य, रोपांचे वाटप

धाटाव : प्रतिनिधी

नाभिक समाजाचे श्रद्धास्थान असलेले श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी कोलाड येथील समाजमंदिरात नुकतीच भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या वेळी समाजातील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप तसेच वारकरी संप्रदायातील मान्यवरांना रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले.

हभप किसनमहाराज पडवळ यांच्या कीर्तनात नाभिक समाजातील लहान-थोर हरिनामाच्या गजरात दंग झाले. आपल्या प्रवचनातून महाराजांनी संत सेना महाराजांचा जीवनपट उलगडून दाखवला. समाजासाठी व इतर घटकांसाठी केलेले त्यांचे कार्य अधोरेखित करताना नाभिक समाजासाठी ते कसे प्रेरणास्थान ठरले हेही सांगितले.

या सोहळ्यास समीर दिवेकर, महेश मोहिते, रूपेश रावकर, समीर दिवेकर आदी उपस्थित होते.



या वेळी नाभिक समाजातील महिला भगिनींनी रुचिता ऋषिकेश रावकर हिचा बीएडमध्ये अव्वल आल्याबद्दल सन्मानित केले.

शैलेश रावकर यांनी कोलाड विभागातील विद्यार्थ्यांसाठी वह्यावाटप करून मुलांच्या शिक्षणाला हातभार लावला. पत्रकार महेंद्र मोरे यांनी समाज एकत्र राहून चांगला कसा करता येईल याचा नेहमी प्रयत्न केला पाहिजे, असे म्हटले.

या उत्सवास कोलाड विभाग नागरिक तरुण समाज संघाचे अध्यक्ष विजय रावकर, विभागीय कार्याध्यक्ष सदानंद साळुंखे, तालुकाध्यक्ष प्रवीण पवार, किरण खंडागळे, उपाध्यक्ष किरण खराडे, खजिनदार निलेश खंडागळे, सचिव चंद्रकांत हुजरे, महिला समिती अध्यक्ष तन्वी सकपाळ यांच्यासह नाभिक समाजातील महिला व ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनुकंपा प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना आवाहन

रायगड : रामप्रहर वृत्त

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात येणाऱ्या एकत्रित गट-क संवर्गातील सामायिक अनुकंपा प्रतीक्षा यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रतीक्षा यादी (विवरणपत्र-अ) व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या स्तरावरील गट-ड संवर्गाची अनुकंपा प्रतीक्षा सूचीतील नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेल्या उमेदवारांची यादी (विवरणपत्र-ब) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्या कार्यालयात व जिल्हा संकेतस्थळ www.raigad.gov.inवर प्रसिद्ध केली आहे.

या यादीतील नाव व क्रमांकाबाबत उमेदवारांची हरकत अथवा आक्षेप असल्यास उमेदवारांनी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्यामार्फत हरकत अर्ज २९ ऑगस्टपर्यंत सादर करावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी, असे जिल्हाधिकारी कार्यालयातील प्र.तहसीलदार (महसूल) गोविंद वाकडे यांनी कळविले आहे.































| भजन मंडळाचे नाव | पत्ता | बुवांची नावे | वेळ |
|---|---|---|---|
| श्रीराम वरदायिणी भजनी मंडळ उलवे | साई प्राईड, से. १९, उलवे | सागर मारुती उतेकर | स. ०९.३० |
| श्री स्वामी समर्थ भजन मंडळ अंजप | मु. अंजप, पो. वाकस | शाम काळूराम मिनमीने | स. १०.०० |
| जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ खोपोली | खोपोली, खालापूर | सौ. रेश्मा नितीन जोशी | स. १०.३० |
| श्री सद्गुरु कृपा प्रा.महिला भजन मंडळ चिंचवली | खालापूर | सौ. प्रिती प्रयाग जाधव | स. ११.०० |
| श्री. गंगादेवी भजन मंडळ | मु. पो. ता. अलिबाग, | श्री. समर्थ सखाराम पाटील | स. ११.३० |
| श्री सिध्देश्वर प्रा.सं. भ..मंडळ आ.(पाठक माळी) | आवास, ता.अलिबाग | भुषण किशोर माळवी | दु. १२.०० |
| श्रीपती बाबा प्रासादिक भजन मंडळ | मु. कोलीवळी (नेरुळ) | कु. चंदना आत्माराम डांगरे | दु. १२.३० |
| शिरसाई प्रासादिक महिला भजन मंडळ शिरसे | मु. शिरसे, पो. कोंदीवडे | सौ. प्रणिता देशमुख | दु. ०२.०० |
| स्वरविहार भजन मंडळ अलिबाग | गोंधळपाडा, अलिबाग | विशाल विजय महाडिक | दु. ०२.३० |
| श्री सोमजाईदेवी प्रासादिक भजन मंडळ | मु. पो. खरसई, ता. म्हसळा | कु. भावेश संतोष शितकर | दु. ०३.०० |
| कै. वैजयंती माता भजन मंडळ सावळे रसायनी | मु. सावळे, पो. रसायनी | कु. श्रध्दा नितीन माळी | दु. ०३.३० |
| आई एकविरा महिला भजन मंडळ | मु. दुंदरेपाडा, पो. मोरबे | सौ. सुजाता पाटणकर | सायं. ०४.०० |
| सुरताल भजन मंडळ नारंगी | मु. नारंगी, पो. डोनवत | श्री. रुपेश अनिल देशमुख | सायं. ०४.३० |
| ओम साई भजन मंडळ खरसुंडी | रा. खरसुंडी, ता. खालापूर | हर्षदा सुशांत सालेकर | सायं. ०५.०० |
| ओंकार संगीत भजन मंडळ नेरळ | सद्गुरु कृपा बंगला,नेरळ | सौ. मंजिरी सागर सावंत तेरसे | सायं. ०५.३० |

# तिरंदाजीत गाथा खडके, शर्वरी शेंडेला 'कांस्य'

**पुणे : प्रतिनिधी**

कॅनडा येथे सुरू असलेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या गाथा खडके, शर्वरी शेंडेने जियाना कुमारच्या साथीने ऐतिहासिक कांस्यपदकाचा कामगिरी केली.

कांस्यपदकाच्या लढतीत अमेरिकेला भारताने एकाही विजयाची संधी दिली नाही. ५५-५३, ५९-५६, ५५-५२ गुणांसह ६-० सेटने भारताने ऐतिहासिक पदकावर मोहर उमटवली. प्रा रणजित चामले हे या संघाचे प्रशिक्षक होते. त्यांच्या प्रोत्साहनामुळे हे यश आले, असे सोलापूरच्या गाथा खडके हिने सांगितले. संघात गाथासह पुण्याची शर्वरी शेंडे व चंदिगडच्या जियाना कुमारचा समावेश होता.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com